# माणूस

शनिवार । २८ नोव्हेंबर १९८१ । एक रुपया


## मुंबईचे साहित्यसंमेलन : वाढत्या सरकारीकरणाचा योग्य निषेध

साहित्यक्षेत्रातील वाढत्या सरकारी हस्तक्षेपाचा निषेध म्हणून मुंबईला एक वेगळे साहित्य संमेलन भरवण्याचा घाट काही मंडळींनी घातलेला आहे. या संमेलनाला पर्यायी, स्वतंत्र वगैरे न म्हणण्याची सावधगिरीही या मंडळींनी बाळगलेली आहे. इतर काही या संमेलनातून साध्य झाले न झाले, तरी सरकारीकरणाच्या विरोधी थोडेफार वातावरण यामुळे निश्चितच तयार होईल. या दृष्टीने मालतीबाई बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या पर्यायी नसले तरी निराळ्या साहित्य संमेलनाचे कुणीही स्वागतच करील. 'पर्यायी' किंवा 'स्वतंत्र' असे म्हणायचे नव्हते तर 'संमेलन' तरी का म्हणायचे हा एक प्रश्न आहे. हा एक मेळावा आहे असेही म्हणता आले असते; पण उडला तर पक्षी, बुडला तर बेडुक अशी दुहेरी सोय 'पर्यायी—स्वतंत्र' न म्हणण्यात व 'संमेलन' हा शब्द कायम ठेवण्यात केलेली दिसते! ते काही असो. सरकारी मदत न घेता किंवा कुठल्या उद्योगपतीला गळ न घालता, काही साहित्यिक, एखादा कार्यक्रम स्वतंत्रपणे, स्वतःच्या किंवा मित्रमंडळींच्या पैशातून यशस्वीपणे पार पाडू शकतात आणि वाढत्या सरकारीकरणाविरुद्धचा असंतोष, असमाधान प्रकट करतात, ही बाब कमी महत्त्वाची नाही. सरकारचा अनाठायी हस्तक्षेप-मंत्र्यांचे वर्चस्व आणि शासनाची मदत-अनुदान, या दोन भिन्न गोष्टी आहेत. समाजवादी समाज रचना, कल्याणकारी राज्य वगैरे कल्पना स्वीकारल्या की, साहित्याचाच काय सामाजिक व वैयक्तिक जीवनातील अनेक अंगांचा शासनाशी नित्य संबंध येणारच. काही देवाणघेवाण, तडजोडी साहित्यिक व साहित्य संस्था व शासन यांच्यात होत राहणारच. दुर्गाबाई भागवत जशी एकांगी भूमिका घेतात तशी शासनाशी पूर्णपणे फटकून राहण्याची भूमिका आजच्या काळात तरी व्यवहार्य ठरू शकत नाही. वैराग्य हवे; पण त्याला विवेकाची जोड हवी असेच संतांनी सांगितलेले आहे. दुर्गाबाईचे वैराग्य आणि अकोला साहित्य संमेलनात व्यक्त झाली तशी भिक्षुकी, ही दोन टोके आहेत व विवेकाची जपणूक केली तरच ही टोके न गाठता, उभयपक्षी सन्मान्य अशा पातळीवर हा साहित्य आणि शासन यांच्यातील संबंधांचा प्रश्न सोडवता येतो. अंतुल्यांसारखा धसमुसळा व बेमुर्वतखोर राज्यकर्ता असेल तर साहित्यिक आणि शासन यांच्यातील संबंध ताणाबाणाचे राहतील, नव्हे, तसे राहायलाही हवेत. त्या दृष्टीने मुंबईला भरणाऱ्या साहित्य संमेलनाने तात्पुरती उघड विरोधाची-निषेधाची भूमिका घेणे आवश्यकच आहे. रायपूरला भरणारे अधिकृत मराठी साहित्य संमेलन अकोल्याच्या वळणावर जाणार हे उघड आहे. अकोल्याला संमेलनापूर्वीही बऱ्याच गर्जना पुण्याहून निघताना केल्या गेल्या होत्या; पण ऐन वेळी विषय नियामक समितीच्या बैठकीतच माघार घेतली गेली व निषेधाचा ठराव सोडाच, विरोधी मताची साधी नोंदही केली गेली नाही व अभिनंदनाचा ठराव करून मंडळी मोकळी झाली! रायपूरलाही यापेक्षा काही फारसे वेगळे घडणार नाही. कारण रायगडाला अजून जाग आलेलीच नाही! येथील सर्वसामान्य जनताच अद्याप मायबापसरकारवादी आहे. मग एकटे साहित्यिक तरी किती ताठ असू शकतील? रायपूरला जाऊन मंत्र्यांच्या वर्चस्वातून साहित्य - संमेलनाची सोडवणूक करणे व निर्भेळ साहित्यिक-रसिकांचे संमेलन असे त्याचे स्वरूप ठेवणे, सद्यःस्थितीत तरी कठिणच दिसते. म्हणून सध्यापुरती वेगळी चूल मांडणे काही वाईट नाही. एक सायकल पंक्चर असली तर दुसरीवर बसून ती ओढत नेता येते. तसे या मुंबईच्या साहित्य-संमेलनाने करायला हवे. मूळच्या संमेलनांना एक परंपरा लाभलेली आहे. काही काळ नको त्या व्यक्तींच्या, प्रवृत्तींच्या वर्चस्वाखाली ही संमेलने गेलेली असली तरी या संमेलनपरंपरेचे शुद्धीकरणही होऊ शकते. अशा शुद्धीकरणप्रक्रियेला मुंबई संमेलनाने चालना दिली तर हा उपक्रम यशस्वी ठरला असेच म्हणावे लागेल.

—श्री. ग. मा.

# मराठी साहित्यिकांचे कर्तव्य कोणते ?

र. धों. घाणेकर, मुंबई

डिसेंबर १९८१ च्या अखेरीस रायपूर येथे वार्षिक साहित्य संमेलन भरत आहे. त्याविषयीचा साधक - बाधक विचार करून, तात्त्विक व मूलभूत मतभेदामुळे बऱ्याचशा विचारवंत, ध्येयवादी साहित्यिकांनी मुंबईला एक पर्यायी मराठी साहित्य-संमेलन भरविण्याची योजना आखली व ती कार्यवाहीत आणण्यासाठी दिनांक १५ नोव्हेंबर रोजी सानेगुरुजी विद्यालयात एक अस्थायी बैठक बोलावली. तेथे शंभराच्यावर मराठी साहित्यप्रेमी हजर होते. बराचसा विचारविनिमय झाला. मार्मिक व चटकदार चर्चा झाली. चर्चेचा विषय खालीलप्रमाणे होता-

१. पर्यायी मराठी साहित्य संमेलन भरवावे का? भरवलेच तर ते कशा थाटाचे असावे ?

२. दरवर्षी भरणाऱ्या साहित्य संमेलनाला जत्रा भरल्याचे जे स्वरूप येते ते टाळता येण्यासारखे आहे का ? मराठी साहित्याचा त्यामुळे काय विकास होतो आहे ?

३. संमेलनाच्या अध्यक्षाची निवड करण्याची प्रथा योग्य आहे का ?

४. निखळ मराठी साहित्याचीच चर्चा व भाषेचा विकास, हा केंद्रबिंदू दृष्टीपुढे ठेवून संमेलन कार्य करते का ?

५. शासनाचा हस्तक्षेप टाळणे आवश्यक आहे का ?

६. महाराष्ट्र सोडून रायपूरसारख्या दूर ठिकाणी मराठी साहित्यसमेलन भरवणे किती प्रशस्त आहे ?

वरील विषयावर बऱ्याच वक्त्यांनी आपली मते व मुद्दे योग्य तऱ्हेने माडले; परंतु त्रयस्थ या दृष्टीने काही व्यवहार्य सूचना व काही धोके मराठी वाचकापुढे ठेवणे मला इष्ट वाटते.

डिसेंबर १९४० मध्ये पुण्यास हिंदी साहित्य संमेलनाचे वार्षिक अधिवेशन घेण्याचे वर्ध्याला ठरले. महात्मा गांधीच्या अधिपत्याखाली नांदलेली हिंदी साहित्य संमेलनाची कार्यकारिणी, वर्ध्याच्या हिंदी-प्रचार-समितीने पोसरून ठेवलीच होती व तिथे 'उर्दूमिश्रित हिंदी हीच हिंदुस्तानची राष्ट्रभाषा' ह्या मुद्द्यावर शिक्कामोर्तब मिळविण्यासाठी महाराष्ट्रातील पुणे हे केंद्र पकडले होते. 'संस्कृत–निष्ठ हिंदी हीच राष्ट्रभाषा, असा प्रचार करणारे हिंदी भाषाप्रेमी काही कमी नव्हते. काँग्रेसजवळ अमाप पैसा होता व त्याच्या जोरावर वर्तमानपत्रे यंत्रणा गांधीनी काबीज करून टाकली होती हिंदु – मुसलमानाची एकी राष्ट्र स्वतंत्र करण्याच्या दृष्टीने जितकी आवश्यक आहे तितकीच उर्दूमिश्रित हिंदी ही राष्ट्रभाषा हिंदी-मुसलमान-एकीला आवश्यक आहे, असे गांधी अट्टाहासाने प्रतिपादन करीत होते. श्री. पुरुषोत्तमदास टंडन आणि हिंदी भाषाप्रेमी अभिमान्यांनी संस्कृत निष्ठ हिंदी वाद्याच्या निरनिराळ्या पातळीवर अनेक परिषदा घेतल्या पण; काहीही घडले नाही. कांग्रेसमधील पुजीवादी भक्तगणानी पोसलेली उर्दूमिश्रित हिंदी वापरण्याची वृत्ती वाढतच गेली. कमी होऊ शकलीच नाही !

ह्या वृत्तीचा नायनाट करण्याच्या उद्देशाने पुण्याच्या संस्कृतनिष्ठ हिंदी भाषा–प्रेमी व्यक्तींनी १९४० मध्ये पराक्रम करून दाखविला. 'केसरी' चे संपादक कै. ग. वि. केतकर ह्यानी मदत करावयाचे मान्य केले. हिंदू महासभेचे अनेक कार्यकर्ते कामाला लागले व अखेर हिंदी साहित्य संमेलनाच्या स्वागत समितीचा कब्जा घेण्याचे ठरविण्यात आले. कार्यकर्त्यांनी ५०० नवीन सभासद नोंदविण्याची तयारी केली व ३१ ऑक्टोबरला दुपारी ३ वाजता व्हावयाच्या स्वागत-समितीच्या कार्यकारी मडळाच्या निवडणुकीच्या अगोदर तासभर ते सभासद नोंदविले बहुमताचे जोरावर निवडणुका करून टाकल्या व निवडणुकाचे निकाल वर्तमानपत्राकडे व पुरुषोत्तमदास टंडन आणि अन्य पुढाऱ्यांकडे तारेने तावडतोब पाठवून दिले. महाराष्ट्र, प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे शंकरराव देव ह्याचा भडका उडाला ते नंतर सायंकाळी पाचच्या गाडीने वर्ध्याला निघून गेले स्वागत समितीने कार्यक्रमाचा तावा घेतला व सभासद कामाला लागले. संमेलन यशस्वी झाले. अनेक हिंदी भाषाप्रेमी पुण्यास आले होते. 'संस्कृत


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : सव्विसावा

२८ नोव्हेंबर १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

निष्ठ हिंदी हीच हिंदुस्थानची राष्ट्रभाषा ' हा ठराव सर्वानुमते पास झाला. इतकेच काय, पण १९४० पासून गेल्या ४० वर्षांत जितकी हिंदी साहित्यसंमेलने भरली त्या प्रत्येक अधिवेशनात हा ठराव पुन पुना माडला गेला व वैचारिक एकी कायम राखली गेली.

या विवेचनावरून मला म्हणावयाचे आहे की, अशा पर्यायी परिषदा घेऊन कार्यशक्ती वाढत नाही, व कार्यसिद्धीही होत नाही. हल्लीच्या लोकशाही युगात लोकशाहीच्याच मार्गाने अशा संस्था काबीज करणे, हे योग्य असते. वयस्क व वर्षागणती मराठी साहित्य लेखक निर्लेप वृत्तीने केवळ कर्तव्य म्हणून पर्यायी परिषदेच्या कार्याला उद्युक्त होतील, नाही असे नाही; पण त्यामुळे मूळ ध्येयवादाची पकड घट्ट होऊ शकेल असे वाटत नाही. वर सागितलेल्या पुण्याच्या हिंदी संमेलनाचे उदाहरण मराठी साहित्यिकानी डोळ्यापुढे ठेऊन, वेगळी सोयरिक न मांडता मराठी साहित्य संमेलनाची कार्यवाही आपल्या मताप्रमाणे करून घेणे, ह्यावाचून दुसरा तरणोपाय नाही. दोघींच्यात वैचारिक मतभेद आहेत, परंतु निराळा ससार थाटणे हा त्याच्यावर तोडगा नाही. मराठी साहित्य परिषदेचे आपल्या विचाराचे जास्तीत जास्त सभासद करून घेणे, कार्यकारी मंडळांत आपल्या विचाराचे साहाय्यिक घुसविणे, हाच एकमेव मार्ग योग्य व फलदायी ठरेल.

मराठी साहित्यिकांच्या पुढे आज अनेक प्रकारच्या महत्वाच्या समस्या उभ्या आहेत. त्या पर्यायी संमेलन भरवून सुटणाऱ्या नाहीत. त्यामुळे कार्यशक्तीची हानी होते, फूट पडते व मूळ मुद्दा बाजूस राहतो. आजच्या मराठी साहित्यिकाच्या पुढे ज्वलंत समस्या खालीलप्रमाणे आहेत.

१. महाराष्ट्र राज्य स्थापन होऊन इतकी वर्षे लोटली तरी शासन, न्यायालये व संस्था ह्याचे कामकाज इंग्लिश भाषेतूनच चालते. ते बंद करावयास शासनामार्फत प्रयत्न करणे.

२. विद्यालये, महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्थांवर राष्ट्रभाषेचाच वापर करावयास लावण्याची शासनामार्फत सक्ती करणे.

३. इंग्लिश भाषेवाचून आमचे चालणारच नाही, हा समाजातील न्यूनगंड काढून टाकण्यासाठी अट्टाहासाने प्रयत्नशील रहाणे.

४. हिंदी राष्ट्रभाषा व देवनागरी लिपी ह्यांचाच व्यवहारात वापर करण्याची सक्ती करावयास शासनास भाग पाडणे.

५. हिंदू विद्यार्थ्याला मातृभाषा व राष्ट्रभाषा ह्याचेच बाळपणापासून १४ वर्षापर्यंत शिक्षण देऊन नंतर इंग्लिश, जर्मन, जपानी, रशियन, फ्रेंच आदी भाषांपैकी एकीचे शिक्षण देण्याची व्यवस्था करावयास शासनास भाग पाडणे.

६. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून मुलांना इंग्लिश भाषा माध्यमातून शिकावयास धाडणारे पालक हे राष्ट्रभाषा व मातृभाषा ह्याचे वैरी आहेत आणि त्यांच्या हातून फार मोठी हानी होत आहे. शासनाने ह्या शाळामधून हिंदी व मातृभाषाच शिकविली गेली पाहिजे, इंग्लिश भाषेची आवश्यकता नाही, असे बंधन आणले पाहिजे.

७. सुसंस्कृत मराठी भाषेची मुंबई दूरदर्शन, आकाशवाणी वा अन्य केंद्रातून होणारी गळचेपी थाबविण्याचा अट्टाहासाने प्रयत्न करणे.

८. बोलण्यात, वागण्यात, लिखाणात इंग्लिश भाषेचा वापर करीत राहिलो म्हणजे आपण खरे सुसंस्कृत, नाही तर अडाणी, हा हिंदू समाजात वाहत चाललेला न्यूनगंड काढून टाकून सर्वांना हिंदी व मराठी वापरण्याचीच सक्ती करावयास शासनाला भाग पाडणे.

मराठी साहित्यिकांच्या पुढे इतक्या समस्या व आव्हाने उभी असताना व स्वातंत्र्य मिळाल्यापासून गेली ३५ वर्षे, म्हणजे दोन पिढ्या, ती आव्हाने तशीच पडून राहिल्याची खंत वाटावयास नको का ? साहित्य परिषदांना शासनाकडून भरपूर अनुदाने मिळतात, मंत्री हस्तक्षेप करतात, परिषदांतून दरवर्षी तेचतेच कार्यक्रम होतात म्हणून खंत बाळगून, मराठी साहित्य परिषदेवर व त्यांच्यातर्फे भरविल्या जाणाऱ्या संमेलनावर रुष्ट होऊन, पर्यायी साहित्य संमेलन भरविण्याने मराठी भाषेचा उद्धार होईल, साहित्य परिषदेची कार्यवाही सुधारेल, असे मराठी साहित्यिकांस वाटत असेल तर ते दोषार्ह ठरेल. उलटपक्षी, पर्यायी मराठी साहित्य संमेलनात भाग घेणाऱ्या लेखकांच्यावर, प्रकाशकाच्यावर नकळत अन्याय होत राहील व ते जनरोषाला पात्र होतील. मूळ मराठी साहित्य संमेलनाला ह्या वर्षी शासनाने पाच लाख अनुदान दिले तर पुढील वर्षी दहा लाख दिले जाईल.

तरी आजच्या मराठी साहित्यिकांचे हेच प्रथम कर्तव्य आहे की, त्यांनी सर्व बाबींचा साधक-बाधकपणे बारकाईने मागोसा घ्यावा, दूरवर नजर टाकावी व आपणास खरे काम काय साधावयाचे आहे ह्याचा पूर्ण विचार करावा. मूळ साहित्यपरिषदच सुधारणे व नीट मार्गावर आणणे, हे उत्तरदायित्व आजच्या मराठी साहित्य-धुरीणांवर येऊन पडलेले आहे, हे निश्चितच ! □


## नवीन दाखल झालेली पुस्तके

१. **मुलखावेगळी माणसं**–बाळ सामंत व रमेश मंत्री
२. **शिरीषासन**–( लेखसंग्रह )–शिरीष कणेकर
३. **पूर्णविराम**–( कादबरी )–नील पद्मनाभन / अनुवाद–वामन चोरघडे
1. **River of Death**–Alistair MacLean.
2. **Tenth Commandment**–( Bestseller-thriller )–Lawrence Sanders
3. **Blitzkrieg**–( Non-fiction–From the rise of Hitler to the fall of Dunkirk ) Len Deighton.

* " I began my life as I shall no doubt end it : among books. "–Sartre.
If more and more people do likewise, there would be lasting peace ! Get engrossed in beautiful and thought-provoking books of ' Phoenix ! '.

**द फिनिक्स लायब्ररी**
७२७ सदाशिव, पुणे ३०.

# मराठवाड्यातील १० नोव्हेंबर

देवीदास पवार

'शेतीमालाला किफायतशीर भाव बांधून द्या!' या मागणीसाठी देशभर गेल्या वर्षी शेतकऱ्यांच्या चळवळी झाल्या. या आदोलनाच्या निमित्ताने देशात एक नवीन विचारमंथन सुरू झाले.

महाराष्ट्रात झालेल्या आंदोलनाचे पडसाद देशभर उमटले. श्री. शरद जोशी व त्यांच्या सहकाऱ्यानी सुरवातीला मर्यादित स्वरूपात, काही जिल्ह्यात ऊस व कादा या नगदी पिकाच्या भावासाठी आदोलन सुरू केले.. या मागणीसाठी निदर्शने, घेराव, सभा, मेळावे इत्यादी कार्यक्रम शेतकरी संघटना घेत असतानाच खेरवाडी येथे शेतकऱ्यांवर निर्घृण गोळीबार झाला—ज्यात शेतकरीबांधव शहीद झाले! तो दिवस इतिहासात नोदण्यासारखा शेतकऱ्यांच्या हृदयात कोरला गेला. तो दिवस आहे १० नोव्हेंबर ८१!

पश्चिम महाराष्ट्रात सुरू असलेल्या ऊस व कांदा आंदोलनाचे मराठवाड्यात काहीच पडसाद उमटले नव्हते. कारण त्या आंदोलनाविषयीचे गैरसमज वाटळीसारखे काही हितसंबंधी पसरवत होते. कोरडवाहू शेतकऱ्याना त्या आदोलनाचे काही महत्त्व वाटत नव्हते व शरद जोशी कोण, काय म्हणतोय, याचा पत्ताही नव्हता!

जानेवारी '८१ मध्ये शरद जोशी व माधवराव मोरे यांचा मराठवाडा-दौरा संघर्षवाहिनी या निर्दलीय युवक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आयोजित केला.

ह्या कार्यक्रम घेण्याअगोदर काही मोजके कार्यकर्ते शेतकरी संघटनेच्या पुढाऱ्यांना भेटले होते—ज्यात अंबाजोगाईचे श्री. रंगराव मोरे, सुधाकर जाधव व अन्य युवक होते.

—मराठवाड्यातील दौऱ्यात शरद जोशी कोण आहेत, याची कल्पना सामान्य शेतकऱ्याना आली. त्याच दरम्यान महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शेतकरी आदोलनात उतरण्याचा निर्णय घेतला होता. मंत्रिमंडळाच्या औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीवर या मागण्यासाठी स्वतंत्र मोर्चा विद्यार्थ्यांनी काढला होता.

फेब्रुवारी व ऑगस्ट महिन्यात अंबाजोगाई व परभणी इथे संघटनेची शिबिरेही झाली.

या दरम्यान मराठवाड्यात एक वातावरण निर्माण होत होते. निपाणीच्या तंबाखू-आंदोलनामुळे, इकडच्या ज्वारीउत्पादक शेतकऱ्यांना आपल्या मागण्या मान्य होऊ शकतील, याचा आत्मविश्वास वाटू लागला.

या वर्षी उसाला भाव देण्यासंबधी सरकारची कुरकुर सुरू झाली. सरकारने गहू व साखर आयात करण्याचे उद्योग सुरू केले.

पिंपळगाव—बसवंत इथे महाराष्ट्रातील शेतकरी आदोलनाचा कार्यक्रम ठरवण्यासाठी ऑक्टोबरमध्ये शेतकरी संघटनेचा मेळावा झाला. मेळाव्याला सर्व कानाकोपऱ्यातील शेतकरी-प्रतिनिधी उत्सुकतेने उपस्थित होते.

याच विराट मेळाव्यात येत्या डिसेंबरपासून महाराष्ट्रात 'शेती मालाला भाव द्या' या मागणीसाठी व्यापक आदोलन उभे करण्याचा निर्णय घेतला.

डिसेंबरमध्ये सुरू होणाऱ्या आदोलनाचा एक भाग म्हणून १० नोव्हेंबरला, खेरवाडी-गोळीबारात धारातीर्थी पडलेल्या शहीदाच्या आठवणीसाठी महाराष्ट्रात एक दिवसाचा 'रस्ता रोको' कार्यक्रम घोषित केला. या घोषणेची हाक संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना होती.

आदोलनाची पूर्वतयारी म्हणून संघटनेचे नेते शरद जोशी, माधवराव मोरे, प्रल्हाद कऱ्हाड पाटील यानी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भाचा दौरा केला.

या दौऱ्यात मराठवाड्यातील सहाही जिल्ह्यात कार्यक्रम झाले. त्यांनी कोरडवाहू शेतकऱ्याच्या जीवनाची व्यथा मांडली. मनाला स्पर्श करणारी व्यथा ऐकून या भागातील समस्त शेतकरी कावरा—बावरा झाला!

गेल्या वर्षीच्या आंदोलनाने काय मिळाले याची खात्री पटली. मराठवाड्यात निसर्गाच्या भरवशांवर जगणारे शेतकरी प्रचंड दरिद्री जीवन पिढ्यानपिढ्या जगतात. त्याची सवय पडल्यामुळे चीड येत नव्हती. या कार्यक्रमाने शरद जोशी व माधवराव मोरे यांनी स्मशानमय जीवन जगणारी ही मंडळी वेळीच जागृत केली.

याच काळात शरद जोशी व अन्य शेतकरी-नेत्याची धरपकड सुरू झाली.

### अंदाज फसले!

धुळे इथे शरद जोशी, माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील आदीना प्रक्षोभक भाषणे केल्याचे आरोप लावून ८ नोव्हेंबरला पोलीस-कस्टडीत रवाना करण्यात आले. ९ तारखेला महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांत १५१ कलमाखाली प्रमुख कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली.

प्रमुख कार्यकर्ते पकडले गेल्यामुळे १० तारखेचा कार्यक्रम फसणार, असे अंदाज काही वृत्तपत्रांच्या संपादकानी अग्रलेखांत माडले.

शहरी वातावरणात राहाणाऱ्या या आमच्या पत्रकार-मित्रांना आदोलनाचा अंदाजच आला नाही!

सरकार मात्र ताकद ओळखून होते. त्यांनी पूर्वतयारी जोरात सुरू केली होती. कुठलीही किंमत मोजून आंदोलन चिरडण्याचा मनसुबा दोन दिवसापूर्वीपासून स्पष्टपणे दिसत होता.

महाराष्ट्रभर होणाऱ्या आंदोलनाची पूर्वी तर सामान्यतः कुठल्याच वृत्तपत्राने दखल घेतली नव्हती. उलट आंदोलनाला विरोध करणाऱ्या काही पुढाऱ्यांचे व दमदाटी करणाऱ्या पोलीस-अधिकाऱ्याचे म्हणणे पहिल्या पानावर छापून भीतियुक्त वातावरण निर्माण करण्यास मदत केली; पण आंदोलन पाहिल्यानंतर मात्र बुद्धिवादी लोकांचे अंदाज उलटे झाले!

महाराष्ट्रातील सर्वच वर्तमानपत्रांतून पोलिसांमार्फत आलेला सत्याग्रहींचा आकडा ३००० छापला. यात मराठवाड्यात १००० सत्याग्रही होते, असे त्याचे मत होते.

मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांत काही

प्रमुख शहरे सोडून या आंदोलनास प्रचंड प्रतिसाद मिळाला, ही वस्तुस्थिती आहे.

१० तारखेला मराठवाड्यात १० ते १५ हजार लोक रस्त्यावर बसून होते. बीड, उस्मानाबाद, जालना, परभणी या जिल्ह्यातील सर्वच प्रमुख रस्ते बंद होते. औरंगाबाद जिल्ह्यात, वैजापूर भागात पूर्ण बंद होता !

उस्मानाबाद जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय हमरस्ता ९ हा बंदच होता. उलट, निलंगा, लातूर, कळंब, भूम, परंडा, औसा, उमरगा या तालुक्यांतील कार्यक्रम शेतकऱ्यांच्या प्रचंड उपस्थितीत झाले !

परभणी येथील कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रेल्वे रोकोचा कार्यक्रम घेतला.

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई, रेणापूर, पानगाव, सोमनाथ, बोरगाव इथे रस्ते अडवले. दिवसभर वाहतूक बंद होती !

पोलिसांकडे यंत्रणा कमी असल्यामुळे बहुतेक ठिकाणी अटक झालीच नाही. अल्पशा प्रमाणात अटक झाली.

## पानगावात तरुणांचा बळी

बीड जिल्ह्यात मात्र पोलिसांनी आक्रमक भूमिका स्वीकारली होती. चहूकडेच पोलीस-अधिकारी दम देण्याचा प्रकार करत होते; याचा उच्चांक पानगाव इथे गाठला गेला !

पानगाव हे अंबाजोगाई तालुक्यातील गाव. इथून मनमाड, काचिगुडा ही रेल्वेलाइन जाते. या परिसरातील शेतकऱ्यांनी 'रेल्वे रोको' कार्यक्रम घेण्याचे ठरवले. सकाळी लोक रेल्वेलाइनवर बसले. त्याच सुमारास एक मालगाडी तिथे आली. गाडी रोखली गेली. पोलीस तिथे तहसीलदारासोबत पोहोचले.

पोलीस-अधिकारी व शेतकरी आंदोलक यांच्यात चर्चा होऊन रस्ता मोकळा करण्यात आला. मालगाडी गेल्यानंतर पोलिसांनी सात लोकांना अटक केल्याचे सांगितले. लोकांनी त्यांना सोडून देण्याची विनंती केली, पण अधिकारी ऐकत नव्हते. कारण रस्ता मोकळा केल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला होता.

आंदोलनातील शेतकऱ्यांचे म्हणणे असे आहे की, पोलिसांनी या सात लोकांना अटक तर केलीच; पण बाकीच्यांना अटक करण्यासाठी साधने नसल्यामुळे पळवून लावण्यासाठी गोळीबार सुरू केला.

पोलीस अधिकारी सांगतात की, जमलेल्या आंदोलकांना भडकवण्यात आले. त्यात या गावचा चेअरमन प्रमुख आहे. लोकांनी दगडफेक सुरू केली म्हणून स्वसंरक्षणासाठी गोळीबार केला. या गोळीबारात रमेश मुगे नावाचा विशीतला तरुण मृत्यूमुखी पडला !

रमेश मुगे हा २० वर्षे वयाचा तरुण. त्याचे वडील लहानपणीच वारले. यानंतर त्याची आई त्याला सोडून गेली !

या लहान मुलाचे संगोपन त्याच्या मूल-बाळ नसलेल्या आत्याने केलं. मोल-मजुरी करून याला वाढवलं. तिला हाच एकमेव आधार होता. गेल्या वर्षीच रमेशचं लग्न झालं. त्याची १३-१४ वर्षे वयाची पत्नी घरात आहे. ट्रॅक्टरवर नोकरी करून तो आपला उदरनिर्वाह भागवत होता. गावातील लोकांत त्याच्याविषयी आपुलकी होती, प्रेम होते.

पोलिसांनी केलेल्या गोळीबारात त्याला पहिली गोळी छातीत लागली. त्यानंतर दुसरी पोटात व तिसरी हातावर ! अशा तीन गोळ्या एकाच तरुणावर झाडून त्याचा अंत केला ! गोळ्या शरीरात घुसल्यानंतर तो तसाच पुढे जाऊन काही अंतरावर कोसळून पडला.

गोळीबारानंतर जमाव पांगला. त्याला पोलीसांनी दवाखान्यात आणून टाकण्या-अगोदरच त्याने तडफडत प्राण सोडला !

निसर्गाने दुर्दैवी आघात केले असताना त्याला तोंड देत जगणारा एक तरुण या पाशवी अत्याचाराला बळी गेला ! उगवता, नवा संसार उद्ध्वस्त करण्याचे कार्य निर्घृण पोलीस-अधिकाऱ्यांनी केले !

आता त्याच्या बेसहारा आत्या व पत्नीला या जगात जगण्याचा काहीच आधार दिसत नाही.

पोलिसांनी केलेला हा गोळीबार कुठल्याही माणुसकीच्या पातळीवर समर्थनीय ठरू शकत नाही !

## महिला रस्त्यावर

या आंदोलनाचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, आंदोलनात महिला मोठ्या प्रमाणासहभागी होत्या. मोरेवाडी या शंभर घराच्या वस्तीतील प्रत्येक घरातील आया-भगिनी आपल्या मुला-बाळांसोबत रस्त्यावर येऊन बसल्या होत्या. भल्या पहाटे सणासारखा लवकर स्वयंपाक उरकून त्या आल्या होत्या.

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाबाबत अपप्रचार होतो की, हे आंदोलन बड्या बागाईतदार शेतकऱ्यांचे आहे. त्यात इतरांना रस असण्याचे कारण नाही. हा आरोप मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी उधळून लावला. या आंदोलनात प्रामुख्याने कोरडवाहू व अल्पभूधारक शेतकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. बाकी ठिकाणी मजूर मोठ्या संख्येने होते.

शेतकरी संघटनेच्या या वर्षीच्या हाकेला मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी इतक्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद का दिला, हा आमच्या बुद्धिवादी मित्रांचा वाद-विवादाचा मुद्दा होऊ शकतो; पण त्याची काही कारणे स्पष्ट दिसून येतात ती पुढीलप्रमाणे आहेत—

शेतीमालाचे उत्पादन खर्चावर भाव बांधून द्या, या मागणीच्या मागचे रहस्य लोकांना उलगडत आहे. दैवावर विश्वास ठेवून चालणाऱ्या बळीराजाला आपली लूट कोण करीत आहे, हे समजत आहे. त्यामुळे मागणी रास्त आहे व आपण सर्व संघटित झाल्याशिवाय ती पदरात पडू शकणार नाही, याची त्याला पूर्णत: कल्पना आली आहे. या मागणीशी, पोट व मन यांची आग भडकून उठल्यामुळे जिव्हाळा निर्माण झाला आहे.

प्रचंड दारिद्र्य भोगत असल्यामुळे त्याची चीड मनात येणे स्वाभाविक आहे.

स्वातंत्र्यानंतर ३०–३५ वर्षांत राजकीय पक्ष व कार्यकर्त्यांनी (पुढाऱ्यांनी) केवळ आश्वासनांचे गाजर दाखवून वेळ मारून नेली ! त्याचा वीट लोकांना आला आहे.

सर्वच राजकीय पक्षांच्या स्थानिक पातळीवरील भ्रष्ट असलेल्या नेतृत्वाला लोक कंटाळले आहेत. इंदिरा काँग्रेस व जनता पक्ष या पक्षांनी विरोध करूनही त्यांचे प्रामाणिक कार्यकर्ते झेंडे बाजूला ठेवून शेतकरी आंदोलनात सामील झाले.

शेतकरी संघटनेने निवडणुकीच्या राजकारणापासून अलिप्त राहण्याचे धोरण जाहीर केल्यामुळे पक्षाला कंटाळलेल्या लोकांना विश्वास वाटू लागला. 'मते मागितली तर जाहीर जोडे मारा !' म्हणणाऱ्या नेत्यांचे म्हणणे विश्वासार्ह वाटून लोक सक्रीयपणे आंदोलनात उतरले.

या आंदोलनात पकडले गेलेले कार्यकर्ते

कारागृहातून मुक्त होत आहेत. अटकेतून परतलेल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वेगळे चैतन्य दिसत आहे. प्रत्येकजण पुढील कार्यक्रमाची आता आतुरतेने वाट पाहात आहे. आंदोलन हे आम्ही एक पवित्र काम करीत आहोत, असे प्रामाणिपकणे लोकांना वाटते.

तथाकथित परिवर्तन व क्रांतीच्या काही चर्चापटूना व पोथीनिष्ठ मित्रांना मात्र विनाकारण अस्वस्थपणा वाटतोय. कारण त्यांनी कुठल्या तरी साचेबंद विचारातून घेतलेले परिवर्तनाचे धडे या आंदोलनाने उलटेपालटे केले आहेत.

त्यांच्या मताप्रमाणे या आंदोलनातील नेतृत्वाला दिशा नाही व कार्यकर्ते वैचारिक पातळीवर येण्यास तयार नाहीत. वैचारिक मंथनातून तयार झालेलेच कार्यकर्ते (केडर) परिवर्तन करू शकतील, असा त्यांचा दावा आहे.

या आदोलनाने जुन्या भ्रष्ट नेतृत्वाला दूर फेकण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. नवीन तरुण गावा—गावातून पुढे येतोय. आंदोलनातून निर्माण झालेले नेतृत्व हे सर्वमान्य असू शकते, लादलेले असू शकत नाही, हे स्पष्ट दिसते.

चळवळीत काही चुका होतील; पण त्यात सुधारणा होऊन नवीन विचार येऊ शकतो, हे आदोलनातून स्पष्ट दिसून येत आहे.

१० नोव्हेंबर हा दिवस खऱ्या अर्थाने या देशातील अडाणी, भोळ्याभाबड्या बळीराजाचा ऐतिहासिक दिवस म्हणून मोजला जाणार आहे !

महाराष्ट्राच्या शेतकरी—शक्तीत आता मराठवाडा सहभागी झाला आहे. कुठलीही संकटे पुढे येवोत, त्याला सामूहिक तोंड देण्याचे आव्हान स्वीकारलेले हे भूमिपुत्र डिसेंबर उजाडण्याची वाट पहात आहेत. □


## नवे प्रकाशन

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
**आधुनिक भारताचा पुराणपुरुष.**
**राजकारण, समाजकारण, तत्वज्ञान**
**आणि साहित्य—कलांचा महानायक.**
**प्रसिद्ध लेखक बाबुराव बागूल सांगताहेत**
**या महानायकाचे गोष्टीरूप चरित्र**

# आंबेडकर भारत

किंमत : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

## उत्तरमीमांसा : २८ :

स. शि. भावे

# मराठी संत

## मध्ययुगीन वास्तववादी विचारवंत

विचारवंताच्या अलिप्ततेसंबंधी लिहिले (उत्तरमीमांसा : २६) तेव्हा पुन्हा इतक्या लवकर या विषयाच्या आणखी एका पैलूवर लिहावे लागेल असे वाटले नव्हते. तथापि, बार्शी येथे नुकत्याच (१४ व १५ नवंबर, ८१) झालेल्या चर्चासत्राच्या निमित्ताने हा पैलू पुन्हा विचारात येतो आहे.

'मराठी संतांचे सामाजिक कार्य व त्याचे मूल्यमापन' हा चर्चासत्राचा विषय होता. बार्शी येथील साहित्य मंडळाने हे चर्चासत्र आयोजित केले होते. प्रा गं. बा. सरदार यांच्या सचालनाखाली झालेल्या चर्चेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. पुष्पा भावे, प्रा. यशवंत मनोहर आदी विविध वयाच्या व दृष्टीच्या विचारवंतांनी आणि साहित्यिकांनी भाग घेतला होता.

संतांच्या बहुरूपी कामगिरीचा विचार करताना, सामान्य माणसासाठी संतांनी नेमके काय केले, असा एक पैलू विचारात घेतला गेला होता. विचारवंतांच्या जबाबदारीच्या संदर्भात मला हा पैलू विशेष महत्त्वाचा वाटतो, म्हणून याच विषयावर एक छोटा निबंध मी चर्चासत्रासाठी सादर केला होता.

संत हे मध्ययुगातील विचारवंत होते. 'बुडती हे जन । न देखवे डोळा' या ऊर्मीने त्यांनी विचार केला. तो लोकांना सांगितला. एकदाच नव्हे तर पुन्हा पुन्हा सांगितला.

□

सामान्याचे सामान्यपण लक्षात ठेवून विचार सांगणे आणि सामान्यांचे बुडतेपण न पाहवण्याइतकी उत्कट ऊर्मी असणे, ही संतांची वैशिष्ट्ये आहेत. ही वैशिष्ट्ये मनात पुन्हा आली ती एका वृत्ताने.

७-११-८१ च्या 'सकाळ'मध्ये प्रभाकर पाध्ये यांच्या एका भाषणाचे वृत्त आहे ते असे :

**'विचारवंतांचे त्यांच्या विचारांवर आणि कल्पनांवर शुद्ध प्रेम असायला हवे. 'विचारांसाठी विचार' या संकल्पनेचा त्यांनी पुरस्कार केला पाहिजे', असे मत साहित्यिक व समीक्षक प्रा. प्रभाकर पाध्ये यांनी 'महाराष्ट्र, समाज व संस्कृती' या विषयावरील हिवाळी प्रशिक्षण–शिबिरात व्यक्त केले.**

**'महाराष्ट्रातील सध्याचे वातावरण विचारवंतांस प्रतिकूल असून, त्यांच्यावर बाह्य घटकांचा प्रभाव पडत आहे', असे सांगून ते म्हणाले की, 'विचारांच्या प्रवाहात 'चळवळ' जेव्हा शिरते तेव्हा विचारवंतांची विचारांपासून फारकत होते त्यानंतर सत्ता येते व सत्तेचे राजकारण सुरू झाले की, विचारवंत भ्रष्ट होतात !'**

हे विचार वाचून अनेक प्रश्न उभे राहतात :

'शुद्ध' म्हणजे काय ? 'चळवळ' ही शुद्धतेला नेहमीच प्रतिकूल असते काय ? 'चळवळ' ही नेहमीच सत्तेकडे नेते का ? सत्तेला विरोधी अशी चळवळ असू शकत नाही काय ?

बरे, आधी सत्ता, तिच्याविरुद्ध चळवळ, मग चळवळच सत्ता होणे आणि पुन्हा या सत्तेविरुद्ध चळवळ असे दुष्टचक्र कायमच राहणार काय ? आणि असे जर ते कायम राहणार असेल तर त्यात शुद्ध विचार असणे, अथवा टिकणे, हे कसे शक्य आहे ? आणि अशा दुष्ट चक्रात 'शुद्ध' विचारांचे अस्तित्व-प्रयोजन (functionality) काय ? 'शुद्ध' विचार अथवा विचारवंत असले काय नी नसले काय, या दुष्टचक्राला त्याची काय फिकीर असणार आहे ?

म्हणज, 'शुद्ध' विचारासंबंधी बेफिकीर आणि म्हणून प्रसंगी विरोधीही, असे हे दुष्टचक्र भेदणे हे तरी 'शुद्ध' विचाराचे आणि विचारवंताचे मूलभूत कार्य असेल की नाही ? या भेदण्यासाठी तरी चळवळ हवी की नाही ?

तसेच, 'शुद्ध' विचारासाठी आणि विचारवंतासाठी अनुकूल वातावरणाची निर्मिती इतरांनी का करावी ? 'शुद्धते'चाही 'उपयोग' असतो, एवढे तरी 'इतरांना' कळायला नको का ? तसे जर त्यांना कळलेच नाही तर हे 'इतर' अनुकूल वातावरण कसे व का निर्माण करणार ?

आणि 'शुद्ध हे उपयोगीही', किंवा 'जे शुद्ध तेच उपयोगी' अशा संकल्पना किंवा सूत्रे, 'इतरांना' समजावून तरी कोण सांगणार ? 'इतर' म्हणजे 'इतर'. ते काही विचारवंत नव्हेत. मग ही सूत्रे त्यांची त्यांना कशी उमगणार ? ही सूत्रे विचारवंतानीच इतरांना समजावून सांगायला नकोत काय ? हे असे समजावून सांगणे ही 'चळवळ'च नव्हे काय ? आणि ही चळवळ विचारवंतानीच करायला नको काय ?

'शुद्ध' विचाराची महती 'इतरांना' समजावून सांगणे या चळवळीला विरोध झाला तर ? सत्ताधीश, पुंड, अडाणी, हितसंबंधी असे वर्ग विरोध करणारच, अडथळे आणणारच. अशा प्रसंगी, आपल्या 'प्रबोधनाच्या चळवळीवरील' हा हल्ला विचारवंतांनी परतवायचा नाही मग त्यांनी काय करायचे ?

'प्रतिकूल वातावरणात' जर विचारवंत एकटे राहिले तरी त्यांना 'शुद्धता' अनुभवता येणार नाही. 'शुद्धते'साठी स्वातंत्र्य हवे असते. प्रतिकूल वातावरणात हे स्वातंत्र्य विचारवंतांना कसे मिळणार ? गप्प बसण्याचेदेखील स्वातंत्र्य त्यांना मिळणार नाही. मग विचारवंत काय करणार ? शुद्धतेसाठी ते मृत्यू स्वीकारणार का ? मृत्यूने तरी काय होणार ? 'शुद्ध' असाल तर नीट अथवा पुरतेपणी जगता येत नाही, ही वस्तुस्थिती कशी बदलायची ? की ही परिस्थिती बदलायचीच नाही ?

आणि ही परिस्थिती बदलायची नसेल

किंवा बदलणे शक्य नसेल, तर 'शुद्ध' विचार करणे किंवा 'शुद्ध' विचारवंत म्हणून जगणे, याला नेमका कोणता व किती अर्थ उरतो ?

विचारवंतांनी निदान या प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे. असा विचार हा देखील 'शुद्ध' विचारच आहे, आणि या प्रश्नांचा विचार करणे हे जसे सामाजिक तसेच वैचारिक कर्तव्य आहे.

¤

संतांनी या प्रश्नांचा विचार केला आहे. सामान्य माणसाला समजेल आणि पटेल आणि आचरणात आणता येईल असा विचार संतांनी केला आहे.

संतांची खरी महत्त्वाची कामगिरी म्हणजे सामान्यपणा म्हणजे काय, हे त्यांनी जाणले. सामान्यपणाचा समग्र आविष्कार, आणि त्याचे वेगळेवेगळे घटक, अशा दोन्ही अंगांनी संतांनी 'सामान्यपणा' ओळखला.

समग्रतेने बघायचे तर 'सामान्यपणा' म्हणजे सर्व बाजूंनी दलितपणा, सर्व बाजूनी कमकुवतपणा आणि सर्व बाजूंनी शोषण. हे असे चालू आहे हेदेखील सामान्यातील काहीना कळते. उरलेल्यांना तेही कळत नाही. ते आपल्याभोवती वेटोळे घालून असणाऱ्या सामान्यपणात सुखी असतात. त्यातच रगलेले असतात.

हे सुखात रंगलेले (रंजले) आणि सामान्यपणाच्या दुःखाने त्रासलेले (गांजले), त्यांना संत 'आपले' म्हणतात. आपलेपणाने त्यांचा विचार करतात. त्यांचा तिरस्कार करीत नाहीत. त्यांना हिडीसफिडीस करीत नाहीत., की त्यांच्यापासून अलिप्त राहून स्वतःच्या 'शुद्ध' वातावरणात रमत नाहीत !

अशी अलिप्तता त्यांना लटकी किंवा उसन्या अवसानाची किंवा स्वप्नखेळासारखी वाटते. याचे कारण त्यांना सर्वंकष वास्तवतेचे ज्ञान झालेले आहे. सामान्यपणा हे एक वास्तव आहे.माणसाच्या एका जन्मात हा सारा सामान्यपणा नाहीसा करणे अशक्य आहे. ही अशक्यता वास्तव आहे. असामान्य-व सामान्य यांचे मूळ एकच आहे, हे वास्तव आहे असामान्यत्वाला सामान्यपणापासून फुटून वेगळे होता येत नाही, हे वास्तव आहे. असा प्रयत्न करणे म्हणजे वास्तवतेकडे पाठ फिरवून कल्पनेच्या जगात विहार करणे आहे. शिवाय सामान्यपणापासून फक्त अंशतःच दूर जाता येईल, हेही वास्तव आहे.

याचाच अर्थ, सामान्याच्या दुःखाचे उत्तर केवळ सामान्यांनी स्वतःच शोधायचे नाही, तर ते असामान्यांनीही शोधायचे आहे. जशी स्त्री-पुरुषांची समानता ही केवळ स्त्रियांचीच जबाबदारी नाही, तर ती पुरुषांचीदेखील आहे.

सामान्यांशी किंवा सामान्यांच्या वागण्यांशी किंवा त्यांच्या जगण्याच्या पद्धतीशी आपला काहीही संबंध नाही, आणि तसा संबंध ठेवला नाही म्हणजे झाले, अशी भूमिका असामान्यांना घेता येणार नाही.

कारण अशी भूमिका वास्तव नाही. असामान्य व सामान्य यांची दुनिया एकच असते. शिवाय असामान्यामध्ये जो सामान्यपणा असतो, त्या सामान्यपणासोबत त्याना जगावेच लागते. त्यांची काय किंवा कोणाचीच काय, सामान्यपणापासून, सामान्यपणाच्या मर्यादापासून सुटका नाही.

सर्वांचा व सर्व ठिकाणचा सामान्यपणा हे वास्तव आहे. हे वास्तव संतांनी जाणले म्हणजे स्वीकारले. स्वीकारल्याशिवाय ज्ञान पुरे होत नाही. हे वास्तव स्वीकारल्यावर त्यांना त्यांचे वैचारिक कर्तव्य उमजले.

ते कर्तव्य हे की, संतानीही सामान्यांसाठी विचार केला पाहिजे. किंबहुना असा विचार त्यांनी केला तरच ते संत !

¤

आधुनिक परिभाषेत समजून घ्यायचे तर सामान्य हे 'सामान्य' म्हणूनच अपंग असतात.

दलित जातीत जन्माला येणे, स्त्री म्हणून जन्माला येणे, गरीब घरात वाढावे लागणे, आई-वडील वा इतर नातेवाईक यांच्याकडून प्रेम वा सहानुभूती न मिळणे, जन्मतःच किंवा नंतर अपघाताने एखादे व्यंग असणे, प्रिय व्यक्तीच्या अकाल मरणाने मन पागळे होणे हे ... जसे अपंगपणाचे प्रकार आहेत, तसाच बुद्धीचा सामान्यपणा, आणि म्हणून व्यक्तिमत्त्वाचा सामान्यपणा, हे अपंगपणाचेच प्रकार आहेत. कारण या उणीवाना इलाज नाही. तसेच या उणीवांनी जे नुकसान होते, जे हाल होतात, जो मनस्ताप सोसावा लागतो, ते खूपसे कमी करता आले तरी पुरतेपणी कधीच संपवता येत नाहीत !

सामान्यपणामुळे होणारे हाल जितके शक्य होतील तितके कमी करायचे आणि उरलेले शहाणपणाने सोसायला शिकायचे, हे सामान्यांसाठी आवश्यक आणि उपयोगी पडणारे शहाणपण. हे शहाणपण सामान्यांना कोणी द्यायचे ? तर असामान्यांनी !

फळीवरचा डबा छोट्या माणसाला कोणी काढून द्यायचा ? तर उंच माणसाने. याउलट उंच माणसाने सांडलेली वस्तू त्याला कोणी शोधून द्यायची ? तर छोट्या माणसाने. तशी अपंगाला मदत कोणी करायची ? तर धडधाकट्याने.

खरे तर हे किती साधे, सोपे आणि सरळ आहे. गंमत अशी की, इतके जे सरळ, सोपे ते असामान्याना एक तर कळत नाही आणि कळले तरी पटत नाही. 'मी काय म्हणून अपंगाचा किंवा सामान्यांचा विचार करायचा ?' असे ते सारखे म्हणतात. आपण सामान्य, त्यांना उत्तरादाखल काय म्हणणार ? आपण इतकेच म्हणू शकू, की अपंगाचा पत्कर घेत नाही, तर तुम्ही कसले धडधाकट ?

¤

असे विचारणाऱ्या आणि न विचारणाऱ्याही सामान्य जनांचा पत्कर सतांनी घेतला. सामान्यपणाच्या मर्यादा शक्य तितक्या कमी कराव्या आणि उरलेल्या मर्यादा ओळखून त्यांचा स्वीकार करावा, हे शहाणपण त्यानी सामान्यांना शिकविले.

ते म्हणाले,

बाबानो, या असामान्यांकडे आशाळभूतपणे बघत बसू नका. त्यांच्यावर अवलंबून राहू नका. स्वत वर अवलंबून राहायला शिका !

स्वत.वरच कसे अवलंबून राहायचे ? तर त्यासाठी स्वत.वरच अवलंबून राहायचे, असा निश्चय करा. हा निश्चय कशाच्या आधारे करावा ? तर स्वाभिमानाच्या आधारे करावा. मान–अपमान तर लहानातल्या लहान मुलाला समजतो. दुसऱ्यावर अवलंबून राहण्यात अपमान असतो, म्हणून दुसरे नकोत !

असे ठरविलेत आणि स्वत.मध्ये डोकावून पाहिलेत, तर ज्याच्यावर अवलंबून राहावे असा कोणी तरी आपल्यातच आहे, हे जाणवेल. आपण सामान्य असलो तरी हा

'कोणी तरी' आपल्या प्रत्येकात असतो.

आपल्या काही गोष्टी त्या 'कोणी तरी' ला पसंत पडतात. काहीमुळे तो 'कोणी तरी' नाराज होतो. त्याला बरे वाटले की आपल्यालाही बरे वाटते. तो नाराज झाला की आपलाही मूड जातो.

त्याचे नाव शोधत बसू नका. त्याची 'संकल्पना' स्पष्ट झाली नाही तरी चालेल. तुम्ही एवढेच बघा. तुमचे मनाचे समाधान 'त्या'च्या खुषी–नाखुषीवर अवलंबून आहे, की आणखी कशावर आहे ?

कदाचित 'लोक काय म्हणतील ?' यावर तुमचे समाधान अवलंबून असेल· वरिष्ठ काय म्हणतील ? धर्मगुरू काय म्हणतील ? अशा बाहेरच्या परिस्थितीवर तुम्ही तुमचे समाधान अवलंबून ठेवले असेल तर या साऱ्या बाहेरच्या गोष्टीवर अवलंबून राहणे सोडा. कारण स्वतःमध्ये डोकावून, स्वत.चा विचार करताना तुम्हाला हे चटकन कळले असणार की, तुमची सुरक्षितता या बाहेरच्या गोष्टीवर अवलंबून असली तरी तुमचे समाधान मात्र तुमच्यातल्या त्या 'कोणी तरी' वरच अवलंबून आहे.

हे कळले आहे ना ? मग पुढे व्हा आणि सुरक्षितता व समाधान याची गुतागुंत सोडवा. त्यांचा संबंध तोडा. हे झाले की, सामान्यपणाची आपल्या पायातली बेडी निखळून पाय मोकळा झालाच म्हणून समजा !

मग प्रश्न पुढे येईल तो इतके दिवस बाधून घातल्याने नाकाम झालेल्या पायांचा अधूपणा घालविण्याचा !

आपल्या शरीराच्या पायाचा अधूपणा घालवायचा तर त्याला तीन उपाय लागतात. तेल, मलम वगैरेनी तो मऊ करणे, हलके हात फिरवून, कुरवाळून तो मोकळा करणे, त्याला त्याच्या कामाचा म्हणजेच चालण्याचा त्याला सराव देणे.

आपल्या पायाकडून हे करून घ्यायचे तर मायेने, हळुवारपणानेच करून घ्यायला पाहिजे. मनातल्या आपलेपणाने हा हळुवारपणा शक्य होईल. आपल्यातला सामान्यपणाही आपलाच. आपण ज्या परिसरात, समाजात नांदतो, त्या परिसराचा आणि समाजाचा सामान्यपणादेखील आपलाच.

म्हणजे असे की, जे आपले नाही असे कोणते ठिकाणच असू शकत नाही. कारण आपण तिथे गेलो रे गेलो की ते ठिकाण आपलेच होते. हा आपलेपणा म्हणजे एखादी उदात्त, भव्य वगैरे वृत्ती नाही, तर तेही एक वास्तव आहे. जसा साऱ्याच वास्तवाचा संत स्वीकार करतात तसाच, कर्तव्य म्हणून, या वास्तवाचाही करतात.

¤

शेवटी संत आणखी एका वास्तवाचा स्वीकार करतात. ते वास्तव म्हणजे माणसाला मर्यादा आहेत. स्थळाची आणि काळाची मर्यादा आहे, हे तर आपण जाणतोच; पण मरणाची जी मर्यादा आहे ती मात्र आपण हरघडी विसरत असतो. संत या मर्यादेची आठवण ठेवतात. सामान्याना ही आठवण करून देतात. ते सागतात की, तुमच्या प्रश्नाची जशी संकल्पनात्मक, आदर्श उत्तरे असतात, तशी मर्यादित, तात्कालिक उत्तरे असतात. आदर्श उत्तराचे चिंतन केले तरी स्वीकार करावा लागतो तो मर्यादित आणि तात्कालिक उत्तराचा !

हा स्वीकार करताना त्या उत्तराच्या मर्यादाचे भान जरूर ठेवा; परंतु ती उत्तरे आदर्श नाहीत, 'शुद्ध' नाहीत, म्हणून जटा आपटून आक्रस्ताळेपणा करू नका अथवा पराभूत होऊन आत्मद्वेषी बनू नका–म्हणजेच सामान्याचे द्वेषी बनू नका ! दिशा आदर्शाची ठेवा, पण या वाटचालीत भुईवर चालणारे पाय संभाळायचे असतात, हेही ध्यानात ठेवा आणि या साऱ्यात जे प्रश्न पडतील, त्यांचा निकाल त्या आतल्या 'कोणी तरी'ला विचारा. तो सागेल तसा समाधानाचा रस्ता धरा. सुरक्षिततेचा रस्ता मात्र धरू नका. तो खोटा असतो. कारण सुरक्षितता अशी काही वस्तुस्थिती नसतेच.

¤

संतानी आणखी खूप सांगितले; पण सामान्य माणसाला त्यांनी स्वतःच्या पायांवर चालायला लावले, हे मला त्याचे सर्वात महत्त्वाचे कार्य वाटते.

सर्वकष झंझावाती क्रातीचा मार्ग खरा की संतांचा मार्ग खरा ? मला संतांचा मार्ग खरा वाटतो. कारण माणुसकीची वास्तव जाणीव त्यांच्या मार्गात आहे.

माणुसकीच्या मूल्याचे वास्तव दर्शन नुकतेच ('केसरी': रविवार, १५-११-८१) अनिल अवचटांनी 'कासार' या अनुभवचित्रात चटका लागेल असे घडविले आहे. ते वाचण्याजोगे आहे. श्री. नळे याचे नाव कासारजातीच्या यादीत घातले जावे म्हणून अवचटानी मदत केली. त्यानंतरच्या चिंतनात ते लिहितात–

'एकीकडे आम्ही जातिव्यवस्था तोडण्यासाठी प्रतिष्ठानची चळवळ चालवतो आणि इकडे एका माणसाला जातीचा सभासद करून घेण्यासाठी खटपट करतो. हे आपण कसं केलं ?...पण दुसरीकडे असंही वाटत राह्यलं की त्या मुलीच्या लग्नाचा प्रश्न निर्माण झाला म्हणून मी त्यात भाग घेतला...जातिव्यवस्थेपेक्षासुद्धा माणुसकीची बाब होती.'

सत हे खरे म्हणजेच वास्तवाची जाण असणारे, विचारवत होते. समाज हा बहुसंख्य सामान्याचा असतो आणि याच्यासबधी असामान्याचे कर्तव्य असते. त्याचप्रमाणे विचारवंतांची विचारवंत म्हणून सामाजिक जबाबदारी असते. वैचारिक प्रबोधनाची 'चळवळ' करणे हे विचारवंतांचे कर्तव्य असते. अशी चळवळ वैचारिक नि.स्पृहतेने केली तर तिचे पर्यवसान सत्ताकांक्षेतच व्हावे लागते असे नाही–अशी संतांची भूमिका होती. त्यातूनच सामान्याना त्यानी त्यांचा मार्ग सागितला.

या मार्गात सामान्यांना त्यांनी त्यांची म्हणून काही कर्तव्येही सागितली आहेत. त्यांचा विचार स्वतंत्रपणे करायला हवा. □

# रशिया

## विकास आणखी मंदावला

वा. दा. रानडे

रशियाचे नेते ब्रेझनेव्ह यानी सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीपुढे केलेल्या भाषणात आजच्या रशियन अर्थव्यवस्थेतील काही उणीवावर व दोषांवर टीका केली. आजच्या गरजांना अनुरूप अशी आर्थिक घडी आणि अर्थप्रणाली तयार करण्यात आमच्या अर्थशास्त्रज्ञाना यश आलेले

नाही आणि अर्थव्यवस्थेची पुनर्रचना आणि नियोजन याबाबतीत फारशी प्रगती झालेली नाही असे त्यानी सांगितले. अन्नआघाडीवरची बिकट स्थिती हा आर्थिक व राजकीय दोन्ही दृष्टिकोणातून पंचवार्षिक योजनेपुढील मुख्य प्रश्न आहे.

रशियात या वर्षी लागोपाठ तिसऱ्यांदा अवर्षण झाले. त्यामुळे धान्यउत्पादन किती झाले आणि ते ठरविलेल्या उद्दिष्टाच्या व गरजेच्या मानाने किती कमी आहे याचे आकडे त्यानी सांगितले नाहीत; पण अमेरिकन तज्ज्ञांच्या अंदाजाप्रमाणे या वर्षी साडेसतरा कोटी टनापेक्षा अधिक उत्पादन झालेले नाही. ते या वर्षासाठी ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षा सहा कोटी टनांनी कमी आहे. असे असले तरी पचवार्षिक योजनेसाठी ठरविलेले धान्य-उत्पादनाचे उद्दिष्ट कमी करण्यात आलेले नाही; पण ते गाठण्यासाठी पुढील चार वर्षे अवर्षण पडले न पाहिजे; पण त्याबाबत खात्री कशी देणार? कारण पावसावर काही रशिया अजून नियंत्रण मिळवू शकलेला नाही. तसेच हे उद्दिष्ट गाठण्यासाठी रशियाला दरवर्षी सरासरी २३ लाख ९० हजार टन उत्पादन करावे लागेल. आतापर्यंत जास्तीत जास्त २३ कोटी ७५ लाख टन उत्पादन १९७८ साली झाले होते. मग दरवर्षी सरासरी २५ कोटी ९० लाख टन उत्पादन आपण करू शकू असे रशियन योजनाकार कशाच्या आधारावर म्हणत आहेत? हे उद्दिष्ट गाठण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या सर्व घटकानी कार्यक्षमतेने काम केले पाहिजे असे ब्रेझनेव्ह म्हणत आहेत.

रशियातील अनेक शहरांतून सध्या बटाटयाची टंचाई जाणवत आहे. त्याचा उल्लेख ब्रेझनेव्ह यांनी केला. धान्यउत्पादन-वाढीसाठी एक खास कार्यक्रम पक्षाने गेल्या वर्षी आखला; पण लक्षणीय सुधारणा दिसून आली नाही. हा प्रश्न एवढा महत्त्वाचा आहे की, मध्यवर्ती समितीची एक सबंध बैठक या चर्चेसाठी घ्यावी लागेल असे ब्रेझनेव्ह यानी सागितले. या प्रश्नाचे त्याना किती महत्त्व वाटते याची त्यावरून कल्पना येते. धान्य-संपादणी, साठवणी, प्रक्रिया आणि वाहतूक या सर्वच बाबतीत त्याना सुधारणा हवी आहे.

मध्यवर्ती समितीची बैठक वर्षातून दोनदा होते; पण या वर्षी ती उन्हाळयात झालीच नाही. पोलंडमधील परिस्थिती हे एक कारण असावे ब्रेझनेव्ह याच्या यापूर्वीच्या भाषणातून नोकरशाहीवर व निरनिराळया खात्यांच्या अकार्यक्षमतेवर टीका असे, या वर्षी शेती-यंत्रणा, गुराची जोपासना, सरकारी शेता-वरील तंत्रात सुधारणा यासाठी जबाबदार असलेल्या खात्याचा नाव घेऊन त्यांनी उल्लेख केला आणि आपापल्या खात्याची घडी नीट बसविण्यास सागितले. प्रतिकूल हवामानाची सबब चालणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. कम्युनिस्ट क्रातीला ६४ वर्षे झाल्या-नंतरही रशियन शेती निसर्गाच्या लहरी हवामानावर अवलंबून असावी हे तेथील शेतीच्या नियोजनाचे अपयशच म्हणावे लागेल.

केवळ शेती आघाडीवरच नव्हे तर एकू-णच रशियाच्या विकासाचा वेग मंदावलेला आहे. स्टालिनच्या काळात राष्ट्रीय उत्पन्न आणि औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा वेग होता तो कमी होत निम्म्यावर कसा आला आहे याची कल्पना देणारे आकडे 'माणूस'च्या २८ फेब्रुवारी १९७६ च्या अंकातील लेखात मी दिले होते तेच येथे पुन: उद्धृत करीत आहे.

### रशियाचा आर्थिक विकास

| वर्षे | राष्ट्रीय उत्पन्न (वाढीचे शेकडा प्रमाण) | औद्योगिक उत्पादन (वाढीचे शेकडा प्रमाण) |
|---|---|---|
| १९५०–५५ | १०·८ | १३ |
| १९५५–६० | ९·७ | १०·४ |
| १९६०–६५ | ६·७ | ८·६ |
| १९६५–७० | ७·१ | ८·४ |
| १९७०–७५ | ५·२ | ६·५ |
| १९७५–८० | ४·७ | ६·५ |

१९८० ते ८५ या काळासाठी आखलेल्या योजनेतही या परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. वीस वर्षांत औद्योगिक प्रगतीत अमेरिकेवर मात करण्याची योजना क्रुशोव्ह यांनी १९६० साली आखली होती; पण १९६४ मध्ये क्रुशोव्ह निधन पावल्या-नंतर त्या योजनेचे नावही राहिलेले नाही! विकासाच वेग वाढण्याऐवजी मंदावला असून ठरविलेली उद्दिष्टेही खाली आणावी लागत आहेत. १९७०–७५ या काळात राष्ट्रीय उत्पन्नात ६·८ टक्के वाढ करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते; पण प्रत्यक्षात ५·२ टक्केच वाढ झाली. याच काळात औद्यो-गिक उत्पादनवाढीचे उद्दिष्ट ८ टक्के ठर-विले होते; पण प्रत्यक्षात त्यात ६·५ टक्केच वाढ झाली विकासाचा मंदावलेला वेग लक्षात घेऊन १९७५–८० या पंचवार्षिक योजने-तील उद्दिष्टे मुळातच कमी ठरविण्यात आली. राष्ट्रीय उत्पन्नवाढीचे प्रमाण ५·२ वरून ४·७ वर आणि औद्योगिक उत्पादन-वाढीचे प्रमाण ६·५ टक्के म्हणजे १९७०-७५ या योजना–काळात होते तेवढेच ठेवण्यात आले. नव्या पंचवार्षिक योजनेत (१९८०-८५) ही उद्दिष्टे आणखी खाली आणली आहेत; पण पहिल्या वर्षाची प्रगती पाहता तीही कितपत साध्य होतील याची शंका वाटते. या वर्षी औद्योगिक उत्पादनवाढीचे उद्दिष्ट ४·१२ टक्के ठरविले होते; पण प्रत्यक्षात वाढ ३·३ टक्क्यापेक्षा अधिक झालेली नाही असा पाश्चात्य निरीक्षकांचा अंदाज आहे. रशियन कामगाराची उत्पादकता या वर्षात ३·६ टक्क्यानी वाढविण्याचे उद्दिष्ट ठर-विण्यात आले होते. प्रत्यक्षात २·६ टक्केच वाढ झाल्याचा अंदाज आहे. नव्या पंच-वार्षिक योजनेत भाडवली गुतवणूकीतही कपात करण्यात आली आहे. गेल्या फेब्रु-वारीत झालेल्या सोव्हिएट कम्युनिस्टपक्षाच्या परिषदेत नव्या पंचवार्षिक योजनेचा जो मसुदा संमत करण्यात आला त्यात भांडवली गुतवणुकीत १२ ते १५ टक्के वाढ धरली होती. आता नियोजनसमितीचे अध्यक्ष निकोलाय के. बेवॅकॉव्ह यांनी मध्यवर्ती समितीपुढे जी अंतिम योजना सादर केली तीत भांडवलगुंतवणुकीचे प्रमाण १०·४ टक्क्यांपर्यंत खाली आणले आहे. या कपा-तीचे समर्थन करताना ब्रेझनेव्ह म्हणाले, 'साधनसंपत्ती आणि गरजा याचा अधिक वस्तुनिष्ठ अंदाज घेऊन हे भाडवलगुंत-वणुकीचे प्रमाण ठरविणे आवश्यक आहे. गुंतागुतीच्या आंतर्राष्ट्रीय परिस्थितीमुळे उपस्थित झालेल्या प्रश्नाचाही उल्लेख ब्रेझ-नेव्ह यांनी केला. संरक्षणखर्च गेल्या वर्षी १७०५ कोटी रूबल होता, तो या वर्षी तेव-ढाच ठेवला असल्याचे अर्थमंत्री गर्बुझॉव्ह यानी अधिकृतपणे जाहीर केले असले तरी अंदाजपत्रकाच्या इतर भागातही सरक्षणाशी निगडित बाबी असून त्यावरचा खर्च यात जमेस धरलेला नाही. संरक्षण खर्चासाठी अधिक तरतूद करणे हाही भांडवलगुत-वणुकीचे प्रमाण कमी करण्यामागे एक उद्देश असणे शक्य आहे.

आर्थिक विकासाचा वेग का मंदावला, तो कसा वाढविता येईल, समाजवादी आर्थिक नियोजनात कोणत्या उणीवा आहेत याचा वस्तुनिष्ठ विचार होणे आवश्यक आहे. □

अवतीभवती । शरद कृष्णन्

## □ सिमेंट–सिमेंट–सिमेंट–

किरकोळ दुरुस्तीसाठी सिमेंट हवे म्हणून माझ्या एका मित्राने ५ पोती सिमेंटसाठी अर्ज केला. त्याला सांगण्यात आले, साधारण वर्ष–दीड वर्षाने एक पोते सिमेंट मिळेल. आता किरकोळ दुरुस्तीसाठी लागणाऱ्या सिमेंटबाबत ही परिस्थिती आहे तर बांधकामासाठी लागणाऱ्या सिमेंटबाबत काय परिस्थिती असेल याची कल्पनाच केलेली बरी. मोठमोठ्या शहरांमधील प्रचंड बांधकामे, सिमेंटअभावी बंद तरी पडली आहेत. किंवा सिमेंट-पोते ३५ रुपयाला मिळायला हवे, त्याला शे–सव्वाशे रुपये मोजून, काळ्या बाजारात ते खरेदी करून, बांधकाम मार्गी लावले जात आहे. सिमेंटच्या या टंचाईचा लाभ महाराष्ट्राच्या बदनाम मुख्यमंत्र्यांपासून अनेकांनी उठवला आणि प्रचंड पैसा उभा केला. हे असे का व्हावे ? विकसनशील देशामध्ये अत्यंत आवश्यकता असलेली सिमेंटसारखी वस्तू सहजी व मुबलक का उपलब्ध होत नाही ? सिमेंट-निर्मिती व्यवसायाचे सध्याचे स्वरूप कसे आहे ? आणि सिमेंटबाबत सध्या असलेली कोंडी फोडण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार काय प्रयत्न करत आहे ? यासारखे प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतात. कोणालाही सहज समजण्यासारखी साधी गोष्ट म्हणजे अपुरा पुरवठा आणि प्रतिदिन वाढत जाणारी प्रचंड मागणी, यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असून उपलब्ध सिमेंटचे वाटप करण्याबाबत ज्यांना अधिकार आहेत, त्यांनी मनात आणले तर गरजूंची अडवणूक करून हवा तेवढा पैसा आज त्यांना उभा करता येतो आहे.

### मागणी–पुरवठा, वाढती दरी

सर्वसाधारणपणे सिमेंटसारख्या अत्यावश्यक वस्तूच्या बाबतीत मागणी–पुरवठा यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला जातो; परंतु आपल्याकडे तसा प्रयत्न झालेला दिसत नाही. आता परिस्थिती काळजी करण्याइतकी गंभीर झाल्यावर सरकारने यात थोडे-फार लक्ष घातले आहे. १९७६ मध्ये गरजेपेक्षा सिमेंटचे उत्पादन ३.५ दशलक्ष टन कमी होते. चालू आर्थिक वर्षामध्ये हे प्रमाण ५.६ दशलक्ष टन असे झाले आहे. १९७८ मध्ये देशामधील सिमेंटचे उत्पादन १९ दशलक्ष टन होते. त्यामध्ये वाढ होऊ शकली नाही; परंतु सिमेंटसाठी असलेली मागणी मात्र वाढतच गेली आणि सिमेंटचा पुरवठा नसल्याने अनेक सरकारी व बिनसरकारी महत्त्वाची बांधकामेही थंडावली. राज्यांना जे सिमेंट उपलब्ध करून देण्यात येत होते त्यामध्ये ३० ते ४० टक्के कपात करावी लागल्याने केवळ मध्यप्रदेशात सिमेंटअभावी बंद पडलेल्या पाटबंधारे योजना, वीज-निर्मिती केंद्राचे काम, सरकारी घरबांधणी योजना आणि अनेक औद्योगिक बांधकामे यांची संख्या १५०च्या घरात आहे. एका राज्यामधील या परिस्थितीवरून देशामधील एकंदर परिस्थिती किती चिंताजनक असेल याची सहज कल्पना येऊ शकते.

सत्तर वर्षांहून जुना असलेला भारतीय सिमेंट उत्पादन हा एक प्रचंड व्यवसाय असला तरी देशांतर्गत गरज पूर्ण होऊ शकेल इतके सिमेन्ट आज उपलब्ध होऊ शकत नाही. सिमेंट उत्पादन व्यवसायाच्या बाबतीत केवळ क्रमवारीचा विचार केला तर भारतीय सिमेंट-निर्मिती व्यवसायाचा जगामध्ये आठवा क्रमांक लागतो. ८५ हजार लोकांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या या व्यवसायात आज २७५ कोटी रुपयाहून जास्त गुंतवणूक झालेली आहे. सिमेंटच्या अपेक्षित उत्पादनापेक्षा प्रत्यक्षात १८ टक्के कमी उत्पादन होते. तेव्हा विद्यमान कारखान्यातून उत्पादनक्षमतेप्रमाणे उत्पादन होईल यासाठी व्यवस्थापनाकडून झटून प्रयत्न होणे जरूर आहे. सिमेंटसाठी सरकारी आणि बिनसरकारी क्षेत्रामधील गरजूंची अक्षरशः रांग लागली असताना उत्पादनक्षमतेइतके उत्पादन झालेच पाहिजे, असे दडपण सरकारने आणले आहे. उद्योगमंत्री नारायण दत्त तिवारी यांनी या संदर्भात सिमेंट उद्योजकांशी सतत संपर्क ठेवला आहे. खाजगी क्षेत्रामधील बांधकामे थंडावली असून सिमेंट काळ्या बाजारात घ्यावे लागत असल्याने घरांच्या, फ्लॅटस्च्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. आज बांधकामासाठी सिमेंट मागणारे २० लाख अर्ज धूळ खात पडले आहेत. पैसा ओतून पैसा खेचण्याची हिंमत दाखवणाऱ्या बिल्डर्संना आज ५० किलोचे एक पोते घ्यायचे असेल तर मुंबईत १२५, पुण्यात १००, दिल्लीमध्ये ७५ तर बंगलोरमध्ये ६५ रुपये जास्त मोजावे लागत आहेत. आता हा पैसा बिल्डर्स काय आपल्या खिशातून थोडाच भरणार आहेत? तो पैसा ते जनतेकडून वसूल करणार. मग फुटाफुटाला डोळे पांढरे व्हावेत अशी किंमत मोजून टोलेजंग इमारतीमधील एखादे खुराडे घेऊन, घर बांधल्याचे समाधान मानून वास्तुशांत करायची वेळ जनतेवर न आली तरच नवल.

### सिमेंट उद्योजकांच्या तक्रारी

सिमेंटच्या अपुऱ्या पुरवठ्याची जबाबदारी घेण्यास सिमेंट–उत्पादक तयार नाहीत. त्यांच्या संघटनेचा असा दावा आहे की, आमच्या गरजेच्या केवळ ५० टक्के वीजपुरवठा होतो आणि कोळसा पुरवठ्याचे प्रमाणही गरजेच्या ६५ टक्के असेल तर आम्ही उत्पादनक्षमतेइतके उत्पादन करणार कसे ? सिमेंट–उत्पादकांची ७.५ दशलक्ष टन कोळशाची मागणी होती. प्रत्यक्षात त्यांना केवळ ३.९ दशलक्ष टन कोळसा उपलब्ध करून देण्यात आला. त्यात आणखी कामगार-प्रश्नांची डोकेदुखी नाही, हे मोठे भाग्यच म्हटले पाहिजे. १९७८ नंतर कामगार-प्रश्नामुळे सिमेंट-उत्पादनावर कोणताही परिणाम झालेला नाही. उत्पादनामधील त्रुटीला प्रामुख्याने कोळसा व वीज यांचा अपुरा पुरवठा जबाबदार असल्याचा त्यांचा दावा असून सिमेंट-उत्पादन वाढवून हवे असेल तर प्रथम या गोष्टीत सुधारणा होणे जरूर आहे ती होत नसल्याने सिमेंट उत्पादन करणाऱ्या ५० युनिटसच्या उत्पादनक्षमतेमध्ये मोठी घट झाली आहे सिमेंटचा कारखाना खाजगी क्षेत्रामधील असो, की सार्वजनिक उत्पादनामधील वाढती घट ही सर्वांनाच मोठी चिंता आहे. १९७८ मध्ये केवळ चार कारखाने उत्पादनक्षमतेच्या ६५ टक्केच उत्पादन करू शकत होते.

१९८० अखेर उत्पादनामध्ये घट झालेल्या कारखान्यांची संख्या २० वर गेली आहे. सर्वसाधारणपणे सिमेंटची मागणी प्रतिवर्षी ८ टक्क्यांनी वाढत गेली असली तरी उत्पादनामध्ये वाढ होण्याऐवजी घट होत गेलेली दिसते. उत्पादित होणाऱ्या सिमेंटचे वितरण १९४२ पासून शासकीय यंत्रणेमार्फत होत आहे. सिमेंटची किंमतही शासनच ठरवते. गेल्या वीस वर्षांत सिमेंटच्या किंमतीमध्ये किमान वीस वेळा वाढ झालेली असली तरी उत्पादन-खर्चाच्या वाढीच्या दृष्टीने हे प्रमाण अतिशय अपुरे आहे, असा सिमेंट-उत्पादकांचा दावा आहे. देशांतर्गत सिमेंटच्या, किमतीत वाढ करण्यास शासन खळखळ करत असले तरी परदेशातून आयात केलेल्या सिमेंटला अफाट किंमत दिली जाते. हे सिमेंट ८०० रुपये टन या दराने आयात केले जाते, तर देशातर्गत तयार झालेल्या सिमेंटला केवळ २६५ रु. टन असा भाव दिला जातो.

सिमेंट-व्यवसायाची काळजीपूर्वक पहाणी करून उद्योगमंत्रालयाने जो अहवाल तयार केला आहे. त्याप्रमाणे विद्यमान कारखान्यांपैकी १२ कारखाने केव्हाही बंद पडू शकतील अशा अवस्थेत आहेत. आणि त्याना जर पुन्हा कार्यरत करायचे असेल तर ५०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे. जुन्या कारखान्यांची अशी अवस्था आहे, तर नवीन कारखाने सुरू करण्याबाबत उद्योजक उत्साही नाहीत. आज सिमेंटचा नवीन कारखाना सुरू करायचा असेल तर ज्याची वार्षिक उत्पादनक्षमता दोख लाख टन आहे, असा कारखाना सुरु करण्यासाठी १५० कोटी रुपयाच्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे आणि एवढी गुंतवणूक करूनही अपेक्षित नफा मिळत तरी नाही किंवा तो नगण्य असतो. या संदर्भात २५ प्रमुख कारखान्यांचा ताळेबंद पाहिला असता देशामधील एकूण उत्पादनाच्या ७० टक्के उत्पादन करणाऱ्या या कारखान्यांचा कर-कपातीनंतरचा नफा केवळ २५ लाख रुपये आहे. १५५ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीवर मिळणारा हा नफा नक्कीच नगण्य आहे.

शासकीय आधिकारी मात्र ही परिस्थिती मान्य करत नाहीत. ते म्हणतात, सिमेंट उद्योगाला मरण तर नाहीच; उलट येती शंभर वर्षे ही या उद्योगाच्या दृष्टीने सुवर्णकाल आहेत. या व्यवसायाच्या संदर्भात आवश्यक असलेले सर्व निर्णय तातडीने व्हावेत यासाठी शासनाने एक उच्चाधिकार समिती नेमली असून सिमेंट व्यवसायाच्या सर्व महत्त्वपूर्ण निर्णयांची अंमलबजावणी झाली तर मागणी व पुरवठा यात पडणारी तूट येत्या पाच वर्षांत भरून काढता येईल.

सिमेंटच्या दोन किंमती ठेवण्याचा पण शासनाचा विचार असून ६५ टक्के उत्पादन नियंत्रित दराने विकायचे व उरलेले उत्पादन खुल्या बाजारात विकण्याची मुभा द्यायची, असे हे धोरण आहे. साखरेच्या बाबतीत याचा अनुभव बरा आला आहे. खेरीज, ८५-८६ अखेर २० दशलक्ष टन सिमेंट उत्पादित करू शकणारे नवीन कारखाने सुरू होतील, असा शासनाचा अंदाज आहे. सुमारे शंभर कंपन्याना किंवा खाजगी व्यक्तींना नवीन सिमेंट-कारखाने सुरू करण्याबाबत परवाने देण्यात आले आहेत खेरीज सध्या जी प्रचंड तूट भासते ती भरून काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सिमेंट आयात केले जात आहे. गेल्या तीन वर्षांत ५ दशलक्ष टन सिमेंट आयात करण्यात आले. अर्थात सिमेंटची गरज प्रचंड असल्याने उत्पादित सिमेंट आणि आयात झालेले सिमेंट चटणीसारखे फस्त होत आहे. शासकीय योजना काय असतील त्या असोत, कारखान्यांच्या तक्रारी व अडचणी कोणत्याही असोत, आज तरी जनतेला एकच गोष्ट जाणवते; ती म्हणजे सिमेंटचा प्रचंड तुटवडा ! त्यामुळेच सध्या तरी कोणत्याही मजबूत बांधकामासाठी आवश्यक असलेले हे सिमेंट जवळजवळ दुर्मिळ झाले असून विक्रीचा मोठा व्यवहार सत्ताधाऱ्यांच्या आणि मूठभर नफेखोराच्या हाती एकवटला आहे.

## ◻ फुटबॉलवेडे कलकत्ता

देशाच्या कोणत्याही भागामध्ये नसेल इतकी प्रचंड लोकप्रियता फुटबॉल या खेळाला कलकत्ता या शहरात लाभलेली आहे. तेथील तीन प्रमुख क्लबमधील चुरस आणि खेळाडूंना प्रचंड दाद देणारा प्रेक्षकवर्ग या गोष्टी या महानगरीच्या अंगभूत भाग होऊन गेलेल्या आहेत. सामने आले की ते शातपणे कसे पार पाडले जातील याबाबत शासन सचित असते. चक्क मुख्यमंत्रीही फुटबॉल हा केवळ एक खेळ आहे, तेव्हा केवळ खेळ म्हणूनच त्याच्याकडे पहा, असे आवाहन वारंवार करतात. प्रमुख सामन्यांची तिकीट-विक्री सुरू झाली की, लंब्याचौड्या रांगा लागतात आणि प्रत्यक्ष सामन्यांच्या वेळी तर मैदान उत्साहाने ओसंडून जात असते. कलकत्ता येथील काही प्रमुख क्लब, फुटबॉल सामन्यात भाग घेणारे नामवंत खेळाडू याच्याकडे आयकर खात्याची नजर गेली आहे. या सामन्यांच्या वेळी मोठे आर्थिक व्यवहार होतात. आपण क्रिकेट-खेळाडूचे स्तोत्र ऐकतो; पण फुटबॉलखेळाडूंनाही मोठमोठ्या रकमा दिल्या जातात. विश्रांतीसाठी थंड हवेच्या ठिकाणी पाठवले जाते. स्वाभाविकपणे आयकर खात्याची नजर या खेळाडूकडे वळली तरी धोरण ताठर नाही. एका आयकर खात्याच्या अधिकाऱ्याने सागितले की, खेळाडूची अथवा या क्लब्जची 'कर-बुडवे' अशी प्रतिमा तयार करणे आम्हालाच आवडणार नाही. खेरीज आयकर खात्यातही या क्लब्जचे व प्रमुख खेळाडूचे चाहते आहेतच. महत्त्वाच्या सामन्याच्या वेळी तिकिटाचा मलिदा त्याना चारला की, ते खूष असतात. खेरीज फुटबॉलवर मनापासून प्रेम करणाऱ्या कलकत्तावासियानाही याबाबत अतिरेकी स्वरूपाची कारवाई केली गेली तर ते रुचणार नाही. अर्थात असे असले तरी आयकर खात्याने आपले काम सुरू केले आहे आणि अगदीच दुर्लक्षित असलेला हा मोठा आर्थिक व्यवहार आपल्या पंजाखाली आणला आहे. खेळाडूंनी आपल्याला फुटबॉल खेळण्यासाठी पैसा मिळतो, हे मान्य केले तर त्याचा 'हौशी खेळाडू' हा दर्जा तावडतोब नाहीसा होईल आणि त्यामुळे त्याच्या खेळावर मर्यादा येतील. खेळाडूंना ते परवडण्यासारखे नसल्याने ते याबाबत काही बोलणार नाहीत. या खेळाडूना किती पैसे दिले जातात याबाबतचा तपशील नोंदला जात नसला तरी वर्षभरासाठी त्याना तीस हजार ते ऐंशी हजार रुपये दिले जातात ! गौतम सरकारला तर एक लाख रुपये दिले गेले असे बोलले जाते. जमशेद, मज्जीद व खाबाजी या तीन इराणी खेळाडूनी एकत्रित खेळण्यासाठी ४ लाख रुपयांची मागणी केली आणि कलकत्त्याच्या एका क्लबने ती पूर्णही केली. आता या

तिघापैकी खाबाजी फॉर्ममध्ये नसला तरी अन्य दोन खेळाडू उपलब्ध होत असल्याने संबंधित क्लबने खाबाजीलाही खपवून घेतला. करारबद्ध केलेल्या खेळाडूना खूष करण्यासाठी आणि त्यांनी सतत तंदुरुस्त व उत्साही रहावे म्हणूनही संबंधित क्लब मोठमोठ्या रकमा खर्ची करतात, तसेच त्यांना अन्य अनेक सुविधा उपलब्ध करून देतात. खेळाडूना बुटांचे १० ते १२ जोड दिले जातात. या सर्व व्यवहारामध्ये क्लब व संबंधित खेळाडू यांच्या अटी वगैरे ठरलेल्या असल्या तरी कोणताही लेखी करार नसतो; परंतु जे ठरवले जाते त्याची अंमलबजावणी संबधित क्लब्ज करतात. आपले खेळाडू दुसऱ्या क्लबकडे जाऊ नयेत यासाठी. अशा स्वरूपाचा बदल करता येण्यासारखी तारीख टळून जाईपर्यंत त्यांना दूर हिल स्टेशनवर पाठवले जाते. खेळाडूंना अर्थातच सांगितले जाते की, तुम्हाला विश्रातीसाठी पाठवले जात आहे. अर्थात खरी परिस्थिती काय आहे हे खेळाडूनाही माहीत असते. मोहन बगान, इस्ट बंगाल व मोहमोदन स्पोर्टिंग क्लब हे तीन प्रमुख क्लब्ज फुटबॉल-स्पर्धेच्या वेळी ६ ते ७ लाख रुपयाचा व्यवहार करतात. तीन वर्षांपूर्वी मोहन बगान क्लबने विश्वल्यात फुटबॉल खेळाडू पेले खेळत असलेल्या कॉसमस क्लबला आमंत्रित केले मात्र, फुटबॉलवेडया कलकत्तावासियानी तिकीटबारीवर एकच झुबड उडवून दिली आणि या क्लबला ८ लाख रुपयाचा निव्वळ नफा झाला! फुटबॉल सामने म्हटले की, आपला क्लब जिंकलाच पाहिजे अशी चाहत्यांची अपेक्षा असल्याने ते प्रचड उत्साहाने प्रतिसाद देतात. हारणाऱ्या क्लबच्या चाहत्याना जिंकणाऱ्या क्लबच्या चाहत्याकडून हेतुत: डिवचले जाते. मग दंगली उसळतात. गुदस्ता मोहन बगान व इस्ट बगाल सामन्यांच्या वेळी दंगल उसळली आणि सोळा प्रेक्षक मारले गेले. मुख्यमत्र्यानी सामनेच बद करून टाकले आणि आपल्या या निर्णयाला ते अखेरपर्यंत चिटकून राहिले. अर्थात नवीन वर्ष आल्यावर पुन्हा सामने आलेच. हे फुटबॉल-सामने कलकत्त्याच्या क्रीडा विश्वातील एक महत्त्वपूर्ण पर्व आहे, एवढे निश्चित.

## □ पंतप्रधान परदेशदौऱ्यावर

'संडे मिड्डे' या लोकप्रिय साप्ताहिक आवृत्तीमध्ये विद्यमान घटनांवर भाष्य करणारे एक मजेशीर सदर असते. 'SUNDAY BUSYBEE' असे या सदराचे नाव आहे. या सदरामध्ये पंतप्रधानाच्या परदेश-दौऱ्यावर विलक्षण मिस्किल टिपण नोदण्यात आले आहे. त्याचा थोडा तपशील येथे देत आहे.

जेव्हा इंदिराजी परदेशदौऱ्यावर जातात तेव्हा त्याचा हा दौरा असा झपाटल्या गतीने पुढे सरकत असतो की, कित्येक वेळा आपण नेमक्या कोणत्या देशात आहोत हेच त्याना माहित नसते. तेव्हा त्या नेमक्या कोठे आहेत याचा तपशील देण्यासाठी एक विशेष सचिव इदिराजीच्या आगेमागे असतोच.

आता परवाचेच पहा ना. इंदिराजीचे खास विमान एका विमानतळावर विसावले. विमानाच्या खिडकीतून बाहेर डोकावले. बराच मोठा समुदाय स्वागतासाठी जमलेला होता. आपण नेमके कोठे आहोत याबाबत त्या साशंक होत्या. इंदिराजींनी संबंधित सचिवांना विचारले, मी उतरल्यावर फ्रेंचमध्ये बोलले तर चालू शकेल ना? आता सचिव झाला तरी प्रथम तो इंदिराजीच्या गोतावळ्यातील एक होयबा. तेव्हा तो लगोलग म्हणाला, आपण फ्रेंचमध्ये अवश्य बोलू शकता. भारतवासियांनी आपल्याला फ्रेंचमध्ये बोलताना दूरदर्शनवर पाहिले आणि त्यांना केवढा अभिमान वाटला? तेव्हा आपण जरूर फ्रेंचमध्ये बोला.मात्र एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, आपण Capitalrly विमानतळावर नाही. आपण तेथे दोन दिवसापूर्वी होतो!

इंदिराजी म्हणाल्या, आपण लंडनमध्ये नाही ना? मला क्रिकेटदौऱ्याचे बोलून कंटाळा आहे. आता मला त्यावर जास्त चर्चा नको आहे. सचिव प्रथम म्हणाला– होय, क्रिकेट-दौऱ्याबद्दल बोलून आपल्याला खरंच कटाळा आला असेल; पण आपल्याला चिंता नसावी. आपण लंडन विमानतळावर नाही; आपल्या गेल्या दौऱ्याच्या वेळी आपण तेथे गेलो होतो आणि बायकॉटने लिहिले पुस्तक वाचून आपण इग्लिश क्रिकेट सघाच्या दौऱ्याबाबतचा निवाडा केला होता. इंदिराजी स्मित करून म्हणाल्या, खरंच की! पण मग आपण मॉस्कोमध्ये तर नाही? तसे असेल तर मला तातडीने गरम कोट चढवला पाहिजे. आणि हातात ग्लोव्हजही घातले पाहिजेत. सचिव पुन्हा प्रथम म्हणाला – होय. मॉस्कोमध्ये नेहमीच बोचरी थंडी असते आपण मॉस्कोला गेल्या वर्षी गेलो होतो. तेथे आपण बॅले पाहिल्याचे स्मरत असलेच!

इंदिराजी लगोलग म्हणाल्या अलीकडे मी सतत प्रवासात असल्याने कदाचित मी नेमकी कुठे आहे ते माझ्या लक्षात येत नसावे. आता मला चटकन सांगा, मी युरोपमध्ये किंवा दक्षिण पूर्वआशियात तर नाही ना?

आता सचिवही गोंधळला होता. तो चटकन फक्त इतकेच म्हणाला, आपण सर्वत्र लोकप्रिय आहात. युरोप, दक्षिण–पूर्वअशिया अमेरिका, सर्वत्र आपली लोकप्रियता आहेच!

त्या स्तुतिपाठकाला मध्येच तोडून इंदिराजी म्हणाल्या– आता उतरायची वेळ आली तरी आपण कोठे आहोत हे काही तुम्ही मला सांगत नाही!

'इंदिराजीच्या मागोमाग असलेला तो सचिव झटकन उत्तरला, मॅडम, आपण दिल्लीत परत आलो आहोत.'

'मोठे विचित्रच आहे! हा नवी दिल्लीचा विमानतळ आहे असे जराही वाटत नाही.'

लगोलग नेहमीच्या तत्परतेने होकार भरून सचिव म्हणाला, 'मॅडम आपल्याला आठवतच असेल की, काही दिवसापूर्वीच आपल्या परदेशगमनाचे वेळी आणि आपण परत येता त्या वेळी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी हजर राहू नये, असा फतवा आपणच काढला होता, त्याची अंमलबजावणी झाली असल्याने दिल्ली आपल्याला जरा वेगळी वाटत आहे इतकेच!'

□

स्टॅलिनच्या अत्यंत जुलमी राजवटीत नागरिकांवर अनन्वित अत्याचार झाले. त्यातून काम-धंद्यानिमित्त रशियात राहिलेले परदेशी नागरिकही सुटले नाहीत. अनेकांना खऱ्या-खोटया गुन्ह्यांसाठी आर्क्टिक भागातल्या गुलामांच्या कामगार-कॅम्पात पाठविण्यात आलं. तिथून निसटून जाण्याचा प्रयत्न जिवावर उदार होणाऱ्या एका छोटया गटानं केला. त्यांनी चार हजार मैलांच्यापेक्षा जास्त अत्यंत खडतर प्रवास पायी केला आणि आपलं अंतिम ध्येय गाठलं-भारत. त्यांच्यापैकी जे सर्वांत कणखर होते त्यांचाच फक्त निभाव लागला.

स्लाव्होमिर रॅविझ हा असाच एक तरुण. फक्त २४ वर्षांचा. पोलंडच्या लष्करात लेफ्टनंटच्या हुद्द्यावर होता. १९३९ साली रशियन गुप्तहेरांनी त्याला हेरगिरीच्या आरोपावरून पकडलं. त्यानं आपण निरपराध असल्याचा बचाव कितीही केला तरी त्याचा मानसिक आणि शारीरिक छळ करून गुन्हा सिद्ध करून दाखवलाच गेला. त्याला २५ वर्षं सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. उत्तर सैबेरियातल्या एका तुरुंग-तळावर त्याची रवानगी झाली.

राक्षसी थंडी असलेल्या त्या बर्फाळ प्रांतातील या भयंकर कॅम्पमधून त्यानं आणि त्याच्या साथीदारांनी केलेल्या चित्तथरारक पलायनाची ही कथा–
यापुढे माणूसमधून क्रमशः येत आहे.
मूळ पुस्तकाचं नाव Long Walk.

रोनाल्ड डाउर्निंग या वार्ताहरानें प्रथम या अद्भुत प्रवासाचा शोध लावला व स्लाव्होमिर रॅविझने सांगितलेल्या या प्रवास-कथेचं शब्दांकन केलं.

# मला निसटलंच पाहिजे !

अनुवादक

श्रीकांत लागू

□

लेखांक पहिला

# तुरुंगवासातील जीवन

सकाळचं धुकं थोडं वितळलं, विरघळलं, थंड, स्वच्छ प्रकाश सगळीकडे पसरला आणि मी चौफेर नजर फिरवली. याच ठिकाणी मला २५ वर्ष खितपत पडायचं होतं. 'कॅम्प ३०३' हेच माझं यापुढं बसतिगृह रहाणार होतं. आर्क्टिक सर्कलपासून फक्त तीनशे ते चारशे मैलांवर असलेली ही छावणी, सुमारे ८००×४०० वार लांब–रुंद होती. चारही कोपऱ्यात उभ्या केलेल्या लाकडी मनोऱ्यात पहारेकरी डोळ्यात तेल आणि हातात मशीनगन घेऊन सदा सज्ज होते. छावणीच्या पश्चिमेकडील अरुंद भागात मुख्य दरवाजा होता. त्याच्याच आजूबाजूला सैनिकांच्या बराकी, स्वैपाकगृह, गुदाम आणि प्रशासकीय कचेऱ्या होत्या. या सर्व कोंडाळ्यानंतर साधारण मध्यापर्यंत जागा मोकळी सोडली होती. कैद्यांपासून उपद्रव होऊ नये म्हणून.

आम्ही आणि बाहेरचं जंगल यांच्यामध्ये नेहमीसारखीच सुरक्षाव्यवस्था होती. म्हणजे या प्रकारच्या तुरुंग–छावण्यांतून असते तशी. आतून पाहिलं तर स्वातंत्र्याच्या आड सर्वप्रथम काटेरी तारांचं भेंडोळं पसरुन ठेवलं होतं. त्यानंतर ६ फूट खोल असा प्रचंड चर सभोवार खणून ठेवला होता. त्या चराची पलीकडची बाजू सरळ उभी कापलेली होती आणि त्यानंतर लगेच १२ फूट उंचीची लाकडी फळ्यांची भिंत! कुणाला धावत येऊन भिंतीवर चढायचा मोह होऊ नये म्हणून ही व्यवस्था. ही भिंत सरळसोट, गुळगुळीत, आधार नसलेली वाटत होती, परन्तु बाहेरुन मात्र भले भक्कम टेकू आधार दिलेले होते आणि त्या भिंतीच्या बाहेरही तारांचं भेंडोळं होतच. त्या दोन्हीच्या मध्ये चांगला तुडवलेला रस्ता होता. या रस्त्यावरूनच गस्त घालणाऱ्या पहारेकऱ्यांची वर्दळ चालत असे. गस्ती–कुत्र्याचं एक पथक घेऊन रात्रभर पहारा चालत असे.

आमचा जवळपास ४५०० कैद्याचा ताडा जेव्हा 'कॅम्प ३०३' वर पोचला तेव्हा तिथं आधीच असलेले 'फिनलंड' सुमारे हजारभर कैदी आम्हाला सामोरे आले. अत्यंत हताश, पराभूत चेहऱ्यानं त्यांनी आमचं स्वागत केलं. त्यांच्यासाठी पूर्व टोकाला चार प्रचंड बराकी होत्या. ८० वार लांब आणि १० वार रुंद अशा बराकी छावणीच्या एकूण रचनेशी सुसंगत होत्या. अरुंद बाजूचं पश्चिमेकडे तोंड, तिथच दार. सुसाट वारा आणि बर्फाचा मारा यापासून बचाव होण्यासाठी दारासमोर एक छपरी आडोसा आणि त्याला उलटचा बाजूला उघडणारी झडप. एक गोष्ट स्पष्ट दिसत होती. सध्या तरी तिथं रहायला आम्हाला नवागताना जागाच शिल्लक नव्हती.

काय करायचं, कसं करायचं, असले विचार करायला त्यांनी संधीच दिली नाही. भोजनासाठी रांगा लावायचा हुकूम सुटला. मुख्य दरवाजाच्या डाव्या हाताला असलेल्या भोजनगृहाच्या उघडचा खिडकीजवळ आम्ही ढकलाढकली करत रांग धरली. नेहमीचंच कॉफीसारखं कसलं तरी फळुकपाणी आणि पाव. घाईघाईत पहिली फेरी संपवून पुन्हा तो काढा घेण्यासाठी दुसऱ्या खिडकीकडे प्रत्येकजण धडपडत होता. त्या गरम पाण्याला तोटा नव्हता. टिनाची डबडीच कमी पडत होती.

तेवढ्यात काही सैनिकांनी एक घडीचा मंच आणला आणि संचलन मैदानाच्या मध्यावर ठेवला. अधिकाऱ्याच्या हुकुमानुसार त्या मंचाच्या भोवती त्यांनी कडं तयार केलं. लगेच सर्व कैद्याना घसमुसळेपणानं त्या कड्याच्या बाहेर वर्तुळाकार गोळा केलं गेलं. या सगळ्यातून वाट काढत, बरोबर रक्षक घेऊन दोन रशियन कर्नल्स आले आणि मंचाजवळ उभे राहिले. त्यातला एकजण वर चढला.

कुठल्याही लष्करात असतात तसा खास धंदेवाईक रुबाब चेहऱ्यावर धारण केलेला तो अधिकारी होता. उंच, शिडशिडीत, कपाळावरच्या केसांच्या बटा पांढऱ्या होऊ लागलेल्या होत्या. ओठावरच्या भुऱ्या मिश्या काळजीपूर्वक कातरल्या होत्या.

ओठापासून निघालेल्या आणि भक्कम हनुवटीत विलीन झालेल्या दोन रेषा त्याच्या रोड चेहऱ्यावर उठून दिसत होत्या. रशियन सैनिकांबद्दल अत्यंत द्वेष मनात असलेल्या, मानहानीमुळे चिडलेल्या, रागानं कोणत्याही क्षणी उफाळेल अशा समुदायापुढे आपण उभे आहोत, हे त्याला सहज जाणवत होतं, पण त्याची पुसटशी निशाणीही त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हती. अत्यंत सहज आरामात तो उभा होता. पायाची कसलीही अधीर हालचाल होत नव्हती.

तो रशियन भाषेत स्वच्छ आणि स्पष्टपणे बोलत होता. 'माझं नाव कर्नल उषाकॉव्ह. मी या छावणीचा सर्वाधिकारी आहे. तुम्हाला इथं कामासाठी आणण्यात आलं आहे आणि साहाजिकच अपार कष्टाची आणि कडक शिस्तीची तुमच्याकडून अपेक्षा आहे. गैरवर्तणुकीचे परिणाम काय होतील याची तुम्हाला कल्पना आहेच. त्यामुळे शिक्षा या विषयावर मी काही बोलणार नाही.

'आमचं सर्वांत पहिलं काम म्हणजे तुम्हाला निवारा देणं. अर्थात ते तुम्हालाच करावं लागणार. तुमच्या बराकी तुम्हालाच बांधायच्या आहेत. या असल्या हवेतून ऊबदार छपराखाली किती लवकर जायचं हे सर्व तुमच्याच प्रयत्नावर अवलंबून आहे.

'तुमच्या जर काही तक्रारी असतील तर त्या मला जरूर सांगा. माझ्या अधिकारात बसतील तेवढ्या सर्व गोष्टी मी करीन. इथं डॉक्टर्स नाहीत, परन्तु प्राथमिक उपचाराची माहिती असलेले काही सैनिक इथं आहेत. तुमच्यापैकी या प्रवासानंतर जे अतिशय आजारी आहेत त्यांची आणि फक्त त्यांचीच सोय, असलेल्या बराकीमध्ये केली जाईल. बाकीच्यानी बराकबांधणीच्या कामाला तडक लागावं, एवढंच मला सांगायचं होतं.'

तो खाली उतरला आणि लगेच दुसरा कर्नल वर चढला. चढला कसला झेपावलाच, कशासाठी तरी उतावीळ झाल्यासारखा. सहजतेचा लवलेशही त्याच्या हालचालीत नव्हता. उषाकॉव्हच्या बाबतीत खऱ्या अधिकाऱ्याचा संयम जाणवत होता, तर ह्याच्या बाबतीत अधिकाराचा उन्मत्तपणा चेहऱ्यावर लहरत होता. उषाकॉव्हपेक्षा पोशाखही जास्त नेटका होता. अंगावर मेंढीच्या कातड्याचं जाकीट, मऊ कातड्याचे उत्तम शिवणीचे, चकचकीत केलेले, उंच बूट होते. वयान उषाकॉव्हचा मुलगा शोभेल असा तरणाबांड होता.

त्याचं नाव जरी त्या वेळी समजलं असल तरी आता मात्र ते अजिबात आठवत नाही. तो राजकीय अधिकारी होता एवढं खरं आणि सर्वसाधारणपणे अशा अधिकाऱ्यांना म्हणतात तेच नाव आम्ही त्याला ठेवलं होतं–पॉली ट्रुक!

पूर्ण मिनिटभर सगळ्या जमावावर नजर फिरवली. ओठाच्या कोपऱ्यात किंचित हसू. चेहेऱ्यावर आत्मविश्वास, सुखवस्तूपणा आणि उद्धटपणा यांचं सुरेख मिश्रण दिसत होतं. सर्व जमाव अस्वस्थपणे जरा चळला आणि स्तब्ध झाला.

बोलताना अत्यंत तुच्छपणे खरखरीत, दणदणीत आवाजात बोलत, खांदे किंचित झुकलेले आणि जाड मोजे घातलेले हात ढुंगणावर, असा तो उभा होता. 'बघा एकदा आपल्या थोबाडांकडे. लडबडलेल्या जनावरासारखे दिसता आहात. तुम्ही म्हणे सुसंस्कृत जगातून आलेले, सगळ्या जगावर अधिकार गाजविणारे. आजवर तुम्हाला जे काही शिक्षण मिळालं त्याचा गर्व आता कुठे गेला '

एखादा उत्तम वक्ता आपलं भाषण अधिक नाटयपूर्ण आणि ठाशीव करण्यासाठी मधेमधे पॉज् घेतो तसा त्यानं घेतला. त्याचा फायदा एका अत्यंत बंडर परन्तु अविचारी तरुणानं घेतला. त्याच्या आवाजानं जखडबंद झालेल्या त्या जमावात प्रचंड चलबिचल झाली. तो म्हणाला, 'यापेक्षा वेगळे कसे दिसणार आम्ही ? तुम्ही आम्हाला दाढी करू दिलेली नाही. साबण नाही, कपडे नाहीत.

पॉलीट्रक आवाजाच्या दिशेने रोखून पहात म्हणाला, 'पुन्हा असा व्यत्यय आला तर तुझा शिधा बंद !'

त्यानंतर पुन्हा अडथळा आला नाही.

' इथे काही दिवस काढलेत की कॉम्रेड स्टालिनच्या मार्गदर्शनाखाली तुम्हाला आम्ही उपयुक्त नागरिक बनवू. जे काम करणार नाहीत त्याना जेवणही मिळणार नाही. तुम्हाला सुधारणं हेच माझं कार्य राहील. विचारदुरुस्तीच्या वर्गांना हजर राहावं लागेल. आमच्याजवळ अत्यंत सुसज्ज अशी लायब्ररी आहे. फावल्या वेळात तिचा फायदा घ्यायला हरकत नाही'.याच थाटात तो आणखीही काही बडबडला. नतर एकदम पटकन म्हणाला, 'काही प्रश्न विचारायचेत'. एका कैद्यानं विचारलं, ' इथे वसत ऋतु केव्हा येतो? ' तो कडाडला, ' मूर्खासारखे प्रश्न विचारू नका !' सभा संपली.

सुरवातीचे काही दिवस. नवीन बराक-बांधणीचं काम म्हणजे नुसता गोंधळ होता. प्रत्येकाची काम करण्याची तयारी जरूर होती; पण ज्याच्या त्याच्या पात्रतेनुरूप कामाची वाटणी करणं फारच अवघड होतं. तीन-चार दिवसात मात्र आपोआप गटवार विभागणी होऊन कामाला सुरुवात झाली. आर्किटेक्ट गटानं रेषा आखून, खुंट्या मारून बराकीच्या जागा निश्चित केल्या. तरुण कामगारानी, थिजून दगड झालेला बर्फ फोडून आधारस्तंभ उभारण्यासाठी मोठ्या कष्टानं खड्डे खणले. जंगलातून आणलेली झाडं निरनिराळ्या कामासाठी वापरता येतील अशी कापून तयार करणारे सुतार होते. जंगल कामगारांचा गट सर्वांत मोठा होता. सकाळी बरोबर ८ वाजता सैनिकाच्या पहाऱ्यात हा गट मुख्य दरवाजातून बाहेर जात असे.

मी जंगल-कामगारात सामील झालो. पहाटे बरोबर ५ वाजता बिगुलाच्या आवाजाने कॅम्प जागा केला जात असे. नंतर सोनखताच्या खड्ड्याकडे मिरवणूक. पाठोपाठ न्याहारीकरता रांगा लागायच्या. नतर अवजाराचे वाटप झाल्यावर अत्यत काळजीपूर्वक यादीबरहुकूम मुख्य दरवाजातून बाहेर सोडत. संध्याकाळी तितक्याच काटेकोरपणे आत घेतलं जात असे.

जंगल मुख्यत्वेकरून पाइनवृक्षाचं होतं. पण बर्च आणि लार्चची झाडंही कमी नव्हती. झाडतोड गटात मी काम करायचो. दोघांनी चालवायची करवत वापरायचो. कधीकधी बदल म्हणून कुऱ्हाड चालवून झाडाच्या फांद्या तोडण्याचं कामही मिळायचं. बरं वाटायचं, कारण लहानपणी पिस्कमधे असताना कुऱ्हाड चालवण्यात माझा हातखंडा होता. माझी ताकद हळूहळू भरून येत असल्याचं जाणवत होतं. या कामाच्या भाऊगर्दीत मी रमू लागलो. आपल्या हाताचा काही तरी उपयोग होतो आहे, या कल्पनेनं एक प्रकारचा अभिमान आणि समाधान वाटू लागलं. दुपारी १ वाजता कापून तोडून झालेला माल बांधकामगाराच्या हवाली करण्यासाठी छावणीत परत जायचो. तेव्हाच दुपारचं भोजन व्हायचं. की लगेच पुन्हा जंगलात जाऊन सूर्यास्तापर्यंत झाडतोड काम सुरू ! बराकीचा आकार दिवसेंदिवस वाढत होता.

पहिल्या पंधरवड्यातच आमच्या झोपडीवजा बराकी पूर्ण झाल्या. प्रत्येक ओळीत १० बराकी अशा २ ओळी, दोन्ही ओळी मध्ये रुंदसर गल्ली. असा एकूण आराखडा होता. शेवटच्या एका अर्धवट बांधून झालेल्या बराकीत मला बाकडं मिळालं होतं. तुम्हाला सागतो,अनेक रात्री उघड्यावर,चावणाऱ्या थंडीत काढल्यावर छपराखाली मिळणाऱ्या उबदार निवाऱ्याचा, सुरक्षिततेचा सुखाचा आनंद अवर्णनीय असतो. नुकत्याच कापलेल्या पाइनवृक्षांचा ओला वास नुसता घमघमत होता. भरभक्कम खांबाच्या भिंतीला लागून, एकावर एक तीन बाकड्यांचे ५० पिंजरेवजा सागाडे होते. एकूण दीडशे लोकाची झोपण्याची सोय होती. बराकीच्या मध्ये सारख्या अंतरावर तीन लोखंडी पत्र्याच्या शेगड्या धगधगत होत्या उबेसाठी. त्याला लागणारं जळण जंगल कामगारानी रोज येताना आणायचं असे. जुन्या अनुभवी कैद्यांनी घालून दिलेल्या धड्याप्रमाणे आम्ही बाकड्यावर घालण्यासाठी खूपस शेवाळं लपवून आणत असू. त्यासाठी आमची ताग भरलेल्या पोत्यासारखी जाकिटं, फुफैका म्हणतात त्याना चांगली उपयोगी पडत असत. धूर बाहेर जाण्यासाठी शेगड्यांना चिमण्या जोडलेल्या नव्हत्या. बाहेर निघणारा धूर छताच्या उच्छ्वास-भोकातून ( छिद्रांतून ) वळसे घेत बाहेर जात असे.

सध्याकाळी ६ ते सकाळी ५ एवढा वेळ आम्हाला बराकीतच काढावा लागे. तशी थोडीशी बराकीच्या आजूबाजूला पाय मोकळे करण्याची परवानगी होती. परवानगी होती म्हणजे मंडळी जोपर्यंत मोठे घोळके करत नाहीत तोपर्यंत दुर्लक्ष होत असे एवढंच. ताराच्या भेंडोळ्यापर्यंत कोणी जात नाही तोपर्यंत पूर्व मनोऱ्यावरून पहारा करणारे सत्री इतर हालचालीकडे काणाडोळा करीत. बराकीत आत करण्यासारखं फारसं काही नव्हतंच. वाचायला काही नव्हतंच आणि असतं तरी पुरेसा उजेडही नव्हता. संध्याकाळी ६ च्यानंतर अधिकृतरित्या परवानगी असलेल्या दोनच गोष्टी करता येत असत. त्या म्हणजे, दर बुधवारच पॉलीट्रकच प्रवचन आणि त्याच्याच अखत्यारीत असलेलं वाचनालय !

माझ्या जवळच्याच बाकड्यावर एक झेकोस्लाव्हाकी कैदी होता. होता तिरसटच. तरीही गमत्या. त्यानं मला एका बुधवारी पॉलीट्रकच्या प्रवचनाला जाण्याच्या भरीला घातलं. हे प्रवचन ड्यूटीवर नसलेल्या सैनिकांना सक्तीचं होतं. आम्ही आल्याचा आनंद जराही न लपवता, आपला धडा पुढे चालू करण्याआधी पॉलीट्रकनं काही

विशेष शेरे मारले. रशियाच्या प्रचंड ताकदीबद्दल, जगात मिळवत असलेल्या महत्त्वाच्या स्थानाबद्दल तो बोलत होत. बोलताना 'भांडवलशाहीचं सडलेलं भूत'या विषयावरही ताशेरे मारायचं त्यानं सोडलं नाही. सैनिक प्रश्न विचारत आणि पॉलीट्रुक त्यांना मार्क्सच्या तत्त्वावर आधारित लेनिन, स्टालिन याच्या भाषणातील आणि लेखातील वचनं उत्तरं म्हणून देत असे. आम्ही निघालो तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचं हसू होतं. मात्र त्याचं हे हसू, थोड्या वेळानं त्या झेक मित्रानं पॉलीट्रुकच्या लाल सैन्याच्या शिक्षणाची जी बेफाम थट्टा केली, ती पाहून, केव्हाच पळालं असतं. सगळे सगे कैदी मात्र धमाल खूष झाले. हा झेक म्हणजे अभिजात नट आणि नकलाकार होता यात शंकाच नाही.

एक महिन्याच्या शेवटी शेवटी छावणीतल्या त्या आयुष्याला एक शिस्तबद्ध ताल सापडला होता. आणि सर्वसाधारण असा समज पसरला की, दूरवर, कडाक्याच्या थंडीतलं एकूण जीवन खडतर असलं तरी अगदीच वाईट नव्हतं. सर्व कैद्यांना सकाळच्या कॉफीबरोबर ४०० ग्रॅम पाव दिला जात असे. त्यातला थोडा सकाळीच संपायचा, थोडा दुपारी आणि उरलेला सध्याकाळी. तोंडी लावायला मात्र तेच गरम पुळूक पाणी असायचं.

क्वचित केव्हाच्या रविवारी मेजवानी असे. म्हणजे सुकवलेले मासे; पण पाव हेच खरं पोटभरीचं खाद्य आणि तोच आमच्या आयुष्यातला सर्वांत महत्त्वाचा भाग होता. तंबाखूही तसा महत्त्वाचाच होता. आठवड्यातून एकदा त्यामानानं बराच वाटा मिळत असे. त्याबरोबरच जुन्या वर्तमानपत्राचा तुकडा मिळायचा, सिगरेटी वळायला. पाव आणि तंबाखू या दोनच वस्तूंना मोल होतं. काही काम करवून घ्यायचं असलं तर याच दोन वस्तूंचा चलन म्हणून उपयोग होत असे.

सुरुवातीच्या महिन्यात छावणीत मृत्यूनं थैमान घातलं होतं. छावणीपर्यंतच्या जीवघेण्या वाटचालीमुळं मनानं आणि शरीरानं पूर्णपणे खचून गेलेले अनेक कैदी पुन्हा उठून उभेच राहू शकले नाहीत ! अस्तित्वात असलेल्या आधीच्या बराकीत त्याना टाकलं होतं. त्याच्याकडून काम होणंच अशक्य होतं. वैद्यकीय मदतीचा विचारच करता येत नव्हता. दिवसचे दिवस पडून रहायचं आणि केव्हा तरी गतप्राण व्हायचं. त्याच्या मित्रामधूनच स्वयंसेवकाच्या तुकड्या खांद्यावर प्रेत घेऊन अत्यंत कडक पहाऱ्यात बाहेर जायच्या. छावणीपासून अर्ध्या मैलावर जरा मोकळ्या जागेमध्ये कबरी खणायच्या आणि त्यात आपल्या मित्राना चिरविश्रांती द्यायची!

मी एकूण दोन वेळा अशा प्रेतयात्रांना गेलो. एका फेरीच्या वेळी अचानक एका विमानाचा शोध लागला. ते कमांडर उषाकॉव्हचं होतं. आमच्या स्मशानवाटेवर एका ठिकाणी अर्धीमुर्धी धावपट्टी असल्याचं लक्षात आलं. तिथंच झाडांच्या आसऱ्याला ताडपत्रानी झाकून ठेवलेलं टायगर मॉथ जातीचं विमानही आढळलं. एका संत्र्यानं अशीही माहिती पुरवली की, याकुत्सला लष्कराच्या मुख्य ठाण्याला, सभेला जायला कर्नल उषाकॉव्ह हे विमान वापरत असे. तो स्वतःच ते विमान चालवत असे.

आमच्या कामाचे तास सोडले तर इतर वेळात, कार्यक्रमात रशियन सैनिक फारशी लुडबुड करत नसत. छावण्याच्या पहाणीचा कार्यक्रमही वेतासबातच व्हायचा. झाडतोड–तुकड्यांमधील कैद्यांना जंगलांत एकमेकामध्ये मिसळायला थोडासा वाव मिळत असे. नवीन मित्र जोडले जात. सुरवाती–सुरवातीला आपल्या सोबत्याजवळची जागा बदलून मिळावी म्हणून परवानगी लागत असे. नंतर मात्र परस्परसामंजस्याने कोणी बराकी बदलत असतील तर परवानगीची जरुरी लागेनाशी झाली. अर्थात, एखाद्याला दुसरीकडे जायला सांगायचं म्हणजे तबाखूची लाच द्यावीच लागे. तरीही एवढीच अट असल्यामुळं सुरुवातीच्या काही महिन्यात बऱ्याच जागाची अदलाबदल झाली. मित्राचे, समविचारी सोबत्यांचे गट आपोआप एकत्र आले.

मला फारसे मित्र नव्हते. अगदीच नाही म्हणायला माझ्याबरोबर सैबेरियाच्या प्रवासात असलेला ग्रेचीनन अधूनमधून भेटत असे. तसंच तो गमत्या झेक होताच. त्याच्या गमत्या आणि दिलखुलास स्वभावाचं मला कौतुक होतं; पण फारशी जवळीक मात्र कधीच निर्माण झाली नाही!

मी माझ्या बाकड्यावर संध्याकाळचे तासन्‌तास, वरती २० फूट उंचीवरच्या छपरातून बाहेर जाणाऱ्या धूरवलयाकडे पहात पडून रहायचो. एक विचार डोक्यात सारखा घणाघात करत रहायचा. २५ वर्षं ! इथं, या खुराड्यात काढायचीत. अनेक परिचित या काळात संपून जातील. नवीन भरती होतील. मीही वयोवृद्ध होत जाईन. २५ वर्ष, आयुष्यात जेवढी वाटचाल करून आलो तेवढेच दिवस इथं काढायचेत. इथून बाहेर जाता येईल ? कसं ? समजा, अगदी खोल खड्डा, तारांचं कुंपण, लाकडी भिंत पार केली तरी पुढं काय ? सैबेरियातून कुणी तरी आपली सुटका करून घेतलीय काय ? कुणी प्रयत्न केलाच तर अशा ह्या दुर्गम, बर्फाळ प्रदेशातून प्रचंड अंतर कापता येईल ? या प्रयत्नात साथ द्यायला अत्यंत निग्रहाचे सोबती मिळतील ? हे असे अनेक प्रश्न मी स्वत.लाच विचारत असे; पण माझ्याजवळ उत्तरं मात्र नव्हती.

एका सध्याकाळी संडासाच्या वाटेवर ग्रेचीननला मी गाठलं. 'ग्रेची, समजा इथून पळून जायचा बेत ठरवला तर तू माझ्याबरोबर येशील का ?' त्याच्या कपाळावर आठ्या चढल्या. 'तू खरंच असला विचार करतोयस?' मी होकार भरला. तो बराच वेळ आपल्या दाढीत बोट फिरवत राहिला. शेवटी म्हणाला, 'रावीक्ष, मी विचार करतो आणि रात्रीपर्यंत तुला काय ते सागतो !'

ग्रेचीनन तसा एकूण सावधच. दुसऱ्या दिवशी बराकीच्या दोन रांगांमधल्या मोकळ्या जागेत मी त्याला गाठलंच. त्यानं नकार दिला. तो म्हणाला, 'संधी मिळाली तर यायलाही हरकत नाही; पण आपण फार दूर जाण्याच्या आधीच गोठवणारी थंडी आणि बर्फ आपला केव्हाच बळी घेतील! रशियन सैनिकांनी आपल्याला पकडण्याची वेळच येणार नाही. नाही मला इतक्या तरुण वयात मरायचं नाहीये !'

**एकच विचार डोक्यात सारखा घणाघात करत राहायचा....२५ वर्षं !**

हाच प्रश्न मी झेकोला विचारला. त्याला तर प्रथम थट्टाच वाटली. माझं गांभीर्य कळल्यावर त्यानं त्याच्या बाकड्यावर मला शेजारी बसवून घेतलं. माझ्या खांद्यावर हात ठेवून अत्यंत सावधपणानं कुजबुजत तो म्हणाला, 'तुझ्याबरोबर यायला माझी हरकत नाही; पण तुला गरज आहे ती सुदृढ, उत्तम तब्येतीच्या माणसांची! माझं पोट माझा जीव घेणार आहे. भयंकर आकड्या येतात. मी तुझ्याबरोबर आलो तर माझा मृत्यु जवळ येईल आणि मला बरोबर घेतल्याचा तुलाही पश्चात्ताप होईल!' काही काळ आम्ही सुन्न होऊन बसून राहिलो. नंतर झेकी पुन्हा म्हणाला, 'मित्रा, संधी मिळालीच तर सोडू नको, इथून मोकळा हो. मात्र आपली माणसं नीट पारखून घे. जा, माझ्या सदिच्छा तुझ्याबरोबर सदैव रहातील!'

आठवड्याचे सहा दिवस अत्यंत कष्टाचे जायचे. नंतरचा रविवार मात्र थोडा आरामाचा जायचा. त्या दिवशी सर्वाधिकारी सर्व कैद्यांच्यासमोर भाषण ठोकायचा. त्यात पुढल्या आठवड्यातील कामाचा मसुदा असायचा, छावणीतील नियमोल्लंघनाचा उल्लेख असायचा आणि दैनंदिन जीवनात बदल घडेल असे काही हुकूमही असायचे.

सुमारे एक महिन्यानंतर एका नव्या कामगिरीसाठी त्यांना कामगार हवे होते. बर्फावर घसरण्याच्या पट्ट्या–स्की–तयार करण्याचं काम होतं. कुणाकडूनच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेना. पावाचा जादा तुकडा मिळण्याची आणि काम चांगलं झाल्यास त्या शिध्यात वाढ करण्याची लालूच दाखवताच जवळपास साठ लोक पुढे आले. मी त्यात होतो. फार पूर्वी केव्हा तरी घसर-पट्ट्याची एक जोडी तयार केली होती. स्वत:ला तज्ज्ञ म्हणवू शकत नव्हतो; पण तीन-चार औंस जादा पावासाठी हा प्रयत्न करायला काहीच हरकत नव्हती.

वाचनालयाच्या घरट्याच्या अर्धा भागात हा घसरपट्ट्यांचा कारखाना थाटला होता. आमच्यापैकी सहाजण खरोखरच कुशल कारागीर होते. एकमेकांच्या संगनमताने त्यांनी बाकीचे लोक वाटून घेतले. बर्चची झाडं तोडून आणणारे, योग्य त्या लांबीचे तुकडे कापणारे, त्यांचा योग्य त्या वेगानं पुरवठा करणारे, शेवटची प्रक्रिया करणारे असे गट पडले. एकदा केव्हातरी घसरपट्टी तयार केल्याच्या अनुभवाचा फायदा म्हणून छपराखाली शेवटच्या प्रक्रिया–गटात काम करायची संधी मला मिळाली.

कारखान्यात घसरपट्ट्यांवर वाफेची काही प्रक्रिया करण्यासाठी एक प्रचंड शेगडी सतत धगधगत असे. तिची सुखद ऊब अर्थातच सर्वांना मिळत असे. त्या उबेमुळे माझी ताकद संपूर्णपणे भरून निघाल्याचं मला जाणवू लागलं. यामुळं वास्तविक त्या सुखासीन अवस्थेचा स्वीकार व्हायला हवा होता; पण दिवसेंदिवस पलायनाचे विचार अधिकच बळावू लागले. मिळणारं अन्न आपल्याला साठवून ठेवता येईल किंवा कसं, याचाच विचार करू लागलो. माझ्याकडे कसलीच योजना तयार नव्हती आणि त्या वेळेपर्यंत एका अत्यंत अनपेक्षित ठिकाणाहून आपल्याला मदत मिळणार आहे याची सुतराम् कल्पना मला नव्हती.

¤

# मुख्याधिकाऱ्याची पत्नी

मी उत्स्फूर्तपणे एक जबाबदारी स्वीकारली होती, तशीच पुन्हा एकदा स्वीकारली. मार्चच्या मध्याचा सुमार असेल. एका रविवारी साप्ताहिक कवायतीचा दिवस होता. कसेबसे पाय ओढत कवायत करणाऱ्या कैद्यांवर बर्फुलांचा पाऊस पडत होता. कवायत थांबवून कर्नल उषाकॉव्हनं विचारलं, 'माझ्याकडे टेलीफंकनचा रेडिओ आहे. तो दुरुस्त करण्याची कुणाला माहिती आहे का?'

मला तो रेडिओ माहीत होता. आमच्या घरी तसला एक होता. जर्मन कंपनीचा होता तो. सर्वजण एकमेकांच्या तोंडांकडे पाहू लागले कोण पुढे येतो? जवळपास मिनिटभर काहीच हालचाल होईना. मला रेडिओ माहीत होता; पण म्हणून मी तो दुरुस्त करू शकेन का? जर करू शकलो तर बाहेरच्या जगातील बातम्या कळतील, अशी जिवाला हुरहूर लावणारी शक्यता होती. दुसरा कुणी तरी ही संधी लाटेल की काय, या जाणिवेनं जिवाचा थरकाप उडाला आणि मी पटकन हात वर केला. एका एन. सी. ओ. नं पुढं येऊन माझं नाव आणि इतर माहिती लिहून घेतली. 'गरज लागेल तेव्हा बोलावीन!'

माझा हा निर्णय अत्यंत सुदैवी ठरणार होता. या निर्णयामुळं कॅम्प ३०३ मधील वास्तव्याच्या अत्यंत चित्तथरारक आणि शेवटच्या पर्वाला सुरवात झाली होती. इथल्या बाह्य जगाशी संबंध तुटलेल्या छावणीत पाच ते सहा हजार कैदी होते. त्याच्यावर देखरेख करायला सैनिक व अधिकाऱ्यांची एक सबंध बटॅलियन होती आणि या सर्व पुरुषांमध्ये स्त्री फक्त एकच होती. उषाकॉव्हची पत्नी! बिघडलेली टेलीफंकन रेडिओ हा तिच्या–माझ्या मधला दुवा ठरणार होता. माझ्या अंदाजाप्रमाणे तिच्याशी संभाषण होऊ शकणारा मीच एकमेव कैदी होतो!

दुसऱ्याच दिवशी घसरपट्टी–कारखान्यात काम करत असताना निरोप आला. गोल गरगरीत चेहऱ्याच्या आयगॉर नावाच्या सैनिकानं येऊन सांगितलं की, साहेबांनी बोलावलं आहे. माझ्याबरोबर चल! आम्ही निघताना साथीदार म्हणाले, 'युद्ध कुठवर आलंय याच्या बातम्या ऐक. पोलंडची काही बातमी मिळते का पहा,' वगैरे सूचना आल्या. ते माझ्याही मनात असल्यामुळं मी त्यांना हात हलवून संमती दर्शवली व तिथून निघालो. मला हे कबूल केलंच पाहिजे की, कमाडण्टच्या घरी जाताना माझ्या मनावर कसलं तरी प्रचंड दडपण आलं होतं. खरं म्हणजे मनातून धास्तावलोच होतो. मुख्य दरवाजातून बाहेर पडल्यावर, अधिकारी भोजनगृहाला वळसा घालून गेलं की, छावणीच्या दुसऱ्या टोकाला कवायतीच्या मैदानाच्या बाजूला त्याचं निवासस्थान होतं. इतर लाकडी घरांसारखीच होती. बर्फुलं, वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी दक्षिणाभिमुख दरवाजा वगैरे. कैद्यांच्या बराकीपेक्षा इथल्या लाकडी तक्तपोशी अधिक सफाईदार होत्या आणि मुख्य म्हणजे उबशेगडीतून निघणारा धूर वाहून न्यायला वरपर्यंत चिमणी होती.

दारापाशी पोचल्यावर उषाकॉव्हनं आयगॉरला जाण्यासाठी खूण

केली आणि मला आत घेतलं. मी जमेल तितका रशियन भाषेचा वापर करून आदर व्यक्त केला आणि रेडिओसेट पहायला आल्याचं त्याना सागितलं.

'हो, दाखवतो ना, असं म्हणून तो आत गेला. त्याची पत्नी समोरच शेगडीसमोर ऊब घेत बसली होती. त्या शेगडीची रचना आतल्या व बाहेरच्या अशा दोन्ही खोल्यांना ऊब मिळेल अशी होती. कर्नलनं औपचारिकपणे त्याच्या पत्नीशी माझी ओळख करून दिली. तिनंही माझ्या अभिवादनाचा किंचित हसून स्वीकार केला. मी तिच्याकडे एकटक पहात राहिलो.' पिस्क सोडताना आईला पाहिलं होतं तेच शेवटचं स्त्री-दर्शन ! मी अत्यंत अस्वस्थ झालो. माझ्या अवताराची मलाच किळस येत होती. गलिच्छ कपडे, अस्ताव्यस्त वाढलेली दाढी, केस, सगळंच ओंगळवाणं वाटत होतं. तरीही तिच्यावरची नजर मी काढू शकलो नाही.

ती उभी राहिली. चांगली उंचीपुरी होती. तिनं लांब, जाडसर स्कर्ट घातला होता, फुलकारी केलेल्या पाढऱ्या ब्लाऊजवर लोकरीचा कार्डीगन घातला होता. बदामी रंगाच्या केसाचा खास रशियन पद्धतीचा अंबाडा तिनं डोक्यावर बाधला होता. तिच्या नितळ कातडीचा तजेला विशेष नजरेत भरत होता. स्त्रीचं वय ओळखण्यात काही मी वाकबगार नव्हतो, तरीही ती चाळिशीची असावी असा आपला एक अंदाज. ती दिसायला तशी सुदर वगैरे काही नव्हती; पण दुसऱ्याचं लक्ष वेधून घेण्याइतकी स्त्रीसुलभ सहजता तिच्यात नक्कीच होती. मी बेभान अवस्थेतून बाहेर आलो आणि लक्षात आलं की, तीही माझ्याकडे आपल्या निळ्या डोळ्यानी पहाते आहे. त्या नजरेत दया आणि आपुलकी पुरेपूर भरली होती. मी नजर वळवली तेव्हा उषाकॉव्ह दोन्ही खोल्यांच्या मधल्या दारात उभा राहून अत्यंत अलिप्त नजरेनं पहात होता.

'ये, मी तुला रेडिओ दाखवतो!' तो म्हणाला. आम्ही खोलीत शिरलो. ती त्याची बेडरूम आणि ऑफिसची खोली होती. शेगडीजवळच्या भिंतीतल्या उघड्या कपाटात त्याचे गणवेष टागलेले दिसत होते. डाव्या हाताला पलग आणि समोरच खण असलेलं कपाट होत. खोलीचा उजवा भाग म्हणजे त्याचं ऑफिस होत. भिंतीवर सैबेरियाचा नकाशा होता. तसच कॅम्प ३०३ चा आराखडा आणि त्याच्याच बाजूला जोसेफ स्टॅलिनचं रंगीत चित्र होतं. त्या स्टॅलिनच्या नजरेखालीच एका बाकड्यावर तो कोरा–करकरीत बॅटरीवर चालणारा टेलीफंकन रेडिओ होता.

उषाकॉव्हनं मला एक 'पुष्की' सिगरेट दिली, रॉकेलचा एक दिवा आणून बाकावर माझ्याजवळ ठेवला. मी रेडिओचं पाठीमागचं झाकण काढलं आणि एखादी तार सुटली आहे की काय, ते बोटानी चाचपडू लागलो. उषाकॉव्ह त्या रेडिओबद्दल अवातर माहिती विचारू लागला. कुठला मेक आहे, कसा चालतो, साधारण किंमत काय असेल, वगैरे.

जरा अडखळतच मी विचारलं, 'कुठून आणला ?'

'दुर्दैवानं १९३९ साली पोलंडमध्ये मी कमाडर होतो. तिथं तो मला मिळाला.'

'दुर्दैवानं' या शब्दानं मी आश्चर्यचकित झालो. सैबेरियासारख्या भागात अधिकारावर असणं, मग तो तुरुंगाचा का असेना, म्हणजे एक प्रकारच्या शिक्षेचाच भाग असतो, असं बरेच कैदी म्हणत असत, त्याची मला आठवण झाली. 'दुर्दैव' शब्द ऐकून माझाही समज असाच होऊ लागला,–आणि नंतर त्याला पुष्टीही मिळाली.–पोलंडमधल्या काही आगळिकीबद्दल उषाकॉव्हची सैबेरियामध्ये नेमणूक झाली असावी.

तो माझ्याजवळून उठला आणि आपल्या बायकोजवळ जाऊन बसला. माझं काम धीम्या गतीनं चालू होतं. तारांचा गुतावळा तपासून पहात होतो. अर्ध्या तासानं माझ्या असं लक्षात आलं की, ती शेजारच्या खोलीत काही तरी करते आहे. त्यानं मला जवळ बोलावलं. तिनं सॅकरीन घातलेल्या चहाचे दोन पेले आणले. एक मला दिला. मग मी पुन्हा कामाला लागलो. माझ्या असं लक्षात आलं की, काम संपवण्याची घाई करण्याचं काहीच कारण नाही. अटक झाल्यानतरचा हा सर्वांत सुखद अनुभव होता आणि तो मला जास्तीत जास्त टिकवायचा होता. आयगॉर मला परत न्यायला आला तेव्हा हे रेडिओदुरुस्तीचं काम म्हणजे किती वेळखाऊ आहे, ते मी त्याला पटवून दिलं. ते व्हाल्व्हज्, त्या किचकट वायर्स, फार काळजीपूर्वक काम करावं लागतं, वगैरे गोष्टी सांगणं भागच होतं.

'ठीक आहे. तुला पुन्हा आलं पाहिजे, मी निरोप पाठवीन तुला !' जाताना उषाकॉव्हनं मला आणखी एक सिगरेट दिली.

सर्वांनी बाहेर मला घेरावच घातला. 'साग, काय बातमी आहे?'

'अजून चालू झाला नाही रेडिओ. मला कळल्यावरोबर लगेच सांगीन !'

दुसऱ्या दिवशी आयगॉर पुन्हा मला न्यायला आला. मी रेडिओ हाताळू लागलो. त्याच वेळी उषाकॉव्ह आणि त्याची बायको हे माझ्याशी संभाषण करू लागले. माझ्या रशियन भाषेवरच्या 'प्रभुत्वा'चं तिला कौतुक वाटलं. मी तिला सागून टाकलं की, माझी आई रशियन होती !

'कोणत्या गुन्ह्यासाठी तुला इथं धाडलंय् ?'– कर्नल.

'कसलाही नाही !'– मी.

'तुला २५ वर्षांची शिक्षा झालीय. होय ना ?'

'हो.'

थोड्या वेळानं ती पुन्हा म्हणाली, '२५ वर्षं म्हणजे फार झाली, नाही ? तुझं वय काय ?' मी २५ वर्षांचा असल्याचं तिला सागितलं.

आमच्या तिहेरी संभाषणात मधेमधे विचित्र शाततेचे क्षण जायचे. ते दोघे एकमेकाला बिलगून बसले होते. मी ओणवा होऊन टेलिफंकन तपासत होतो. उषाकॉव्हनं अचानक विचारलं की, रशिया पुन्हा एकदा युद्धात अडकेल असं तुला वाटतं ? मी चक्रावलोच. त्याच्या दृष्टीनं १९१४ सालचं युद्ध हे शेवटचं युद्ध झालं. मी फिनलंड आणि पोलंडचा उल्लेख करताच तो म्हणाला, 'छे, छे, ते काही युद्ध नव्हतं, तो त्यांचा मुक्ती-सघर्ष होता !' मी गरकन् वळून मागे पाहिल. तो माझी नजर चुकवून निर्विकार चेहऱ्यान आढ्याकडं पहात होता.

**'२५ वर्षं म्हणजे फार झाली. . . .तुझं वय काय ?'**

त्यानं रशिया युद्धात सहभागी होण्याचा प्रश्न पुन्हा काढला.

'पोलंडमध्ये गोअरिंग मदत मागण्यासाठी येऊन गेला तेव्हा सर्वांचा असा समज झाला की, रशियावर हल्ला करण्यासाठी पोलंडचा आडोसा म्हणून उपयोग करायचाय्. जर्मनीची तयारी झालेली आहे आणि आता रशियावरची चढाई अटळ आहे!' मी एका दमात भळभळा बोलून टाकलं. मला वाटलं की, जादा वटवट करण्याबद्दल चागली तंबी मिळणार; पण त्या दोघांनी कसलीच प्रतिक्रिया दाखवली नाही.

माझ्या असं लक्षात आलं की, त्यांनाही रेडिओ दुरुस्त होण्याची कसलीच घाई नव्हती. बॅटरीला जोडली जाणारी एक वायर जरा सैल आहे; त्यामुळे रेडिओ चालत नाहीचाय्, हे केव्हाच माझ्या लक्षात आलं होतं, पण मीच रेडिओ चालू करायची टाळाटाळ करत होतो. नाहीतर इथल्या सुखद फेऱ्या थांबल्या असत्या!

ती मला युद्धपूर्व पोलंडबद्दल प्रश्न विचारी. तिथल्या बायकांच्या फॅशनी कशा होत्या? उंच टाचाचे बूट वापरत का? मी बेधडक सांगायचो की, कपड्याच्या फॅशन्स थेट पॅरिसच्या असत. कपडे, बूट सर्व काही अतिशय आकर्षक असतं.'

दोन दिवसानंतर मला पुन्हा बोलावणं आलं.

या वेळी मात्र मी रेडिओ चक्क चालू करायच्या प्रयत्नाला लागलो. उषाकॉव्ह आपल्या कामात दंग होता. त्याची बायको मात्र माझ्याशी बोलत होती. सिनेमांबद्दल बोलताना जेव्हा मी सागितलं को, पोलंडमध्ये रशियन सिनेमाना बंदी होती, तेव्हा तर तिला आश्चर्यच वाटलं. बोलणं चालू असतानाच मी रेडिओचं बटण दाबलं आणि त्याच्या जिवात जीव आला, त्यातून नेहमीचे घुमारे येऊ लागले. मी डायल फिरवून कुठलं स्टेशन लागतं का पाहू लागलो. आवाज ऐकताच उषाकॉव्ह काम सोडून माझ्याजवळ आला. मॉस्को रेडिओवरचा एक वाद्यवृंद ऐकला. मी मला जे ऐकायचं त्यासाठी निरनिराळी स्टेशनं पकडायचा प्रयत्न करत होतो. काही ठिकाणच्या बातम्या ऐकायला मिळाल्या, शेवटी अचानक हिटलरचं त्याच्या नेहमीच्या थाटाचं भाषण थोडंसं ऐकायला मिळालं.

जाताना उषाकॉव्हने कोरीझकी तंबाखूचं सबंध पाकीटच दिलं आणि सिगरेटी वळण्यासाठी आख्खा वर्तमानपत्राचा कागदही दिला. म्हणाला, 'आम्हाला काही त्या रेडिओतलं कळत नाही. गरज लागली तर पुन्हा बोलवीन.' परत जाताच गराडा घातलेल्या मंडळींना मी काय काय ऐकलं ते सर्व सागितलं. सगळ्यात मोठं आकर्षण ठरलं ते जर्मनी आणि हिटलरचं भाषण!

मार्च संपत आला होता. कारखान्यात विनाव्यत्यय काम चालू होतं. टेलीफंकन-प्रकरण संपल्याची हळहळ मला वाटू लागली. त्याच सुमाराला एका वैशिष्ट्यपूर्ण माणसाशी माझी ओळख झाली. ॲनास्ताझी कोलमेनो. त्याचं नाव. मी त्याला ऊब घेण्यासाठी शेगडीजवळ आलेला अनेक वेळा पाहिला होता. दणकट शरीरयष्टीचा अत्युत्तम नमुना होता तो. सहा फूटाहून जास्त उंच. भुऱ्या रंगाच्या केसानी भरलेलं डोकं आणि चेहरा. हिरवेगार घारे डोळे. कोणाच्याही नजरेत सहज भरेल असा तो होता. तिथल्या हलाखीच्या परिस्थितीतही त्याचं वजन दोनशे पौंड असेल. अतिशय नम्र. कोणालाही मदत करायला तयार असलेला तो पूर्ण पुरुष होता. बर्चचे ओंडके वाहून आणून ते घसरपट्ट्यांना वापरता येतील असे फोडून देणं हे त्याचं काम.

कारखान्याच्या दाराबाहेर उभा राहून मी त्याच्याकडे पहात होतो. त्याचं नेहमीचं वाहकाचं काम चालू होतं. त्याला थोडी मदत करावी या हेतूनं मीही तिथं गेलो आणि एक ओंडका उचलण्यासाठी हात घातला. तो ओडका हलतोय कशाला! उचलणं तर सोडाच पण एक इंचभरही हलला नाही. माझी अवस्था पाहून कोलमेनो तिथं आला नि म्हणाला,

'ठीक आहे दोस्त. छोडो. मी उचलतो ते!'

तो खाली वाकला आणि एकाच झटक्यात त्याने तो ओंडका असा काही खांद्यावर घेतला की, देखते रहो. मी स्वतःकाही तसा अशक्त नव्हतो, पण हे म्हणजे अजबच प्रकरण होतं. आम्ही एकमेकाची ओळख करून घेतली. तो लॅटव्हियामधे जमीनदार होता. वय फक्त २७ वर्षं! पलायनाची माझी कल्पना पुन्हा उफाळून आली. पण ही बोलायची जागा नव्हती. 'आपल्याला केव्हा तरी नीट बोललं पाहिजे.' मी म्हणालो.

'अवश्य. भेटू या. मला आवडेल', तो भीमावतार म्हणाला.

कारखान्याच्या खडखडाटात सहकाऱ्यानी ओरडून सागितलं, 'अरे तुझ्या 'मित्रानं' तुला बोलावलंय'. आयगॉर माझी वाट पहात पुतळ्यासारखा उभा होता. हातातली घसरपट्टी खाली ठेवली, कपडे झटकले आणि त्याच्याबरोबर बाहेर पडलो.

उषाकॉव्हबरोबर तीही होतीच. त्यानं सागितलं की, रेडिओ चालतोय, पण आवाज फार हळू येतोय. मी तपासणी सुरू केली. रेडिओ चालत तर होता, पण आवाज अतिक्षीण येत होता. बॅटऱ्या बदलायला हव्या आहेत, असं मी सागितलं. 'करतो काही तरी व्यवस्था', म्हणून त्यानं आपला ग्रेटकोट अंगावर चढवला आणि अधिकाऱ्याच्या मीटिंगला जायचंय, असं काही तरी बायकोजवळ पुटपुटून बाहेर निघून गेला. एकमेकावर अतिशय जीव असल्याचं त्या दोघाच्या हावभाव, हालचालीवरून सहज जाणवत होतं.

'मी तुझ्यासाठी चहा करते, तोपर्यंत त्यातल्या त्यात एखादं स्टेशन मिळतं का पहा ना! गाणं तरी ऐकायला मिळेल', ती हसत म्हणाली.

ती संगीताविषयी बरंच बोलत राहिली. चॉपीन बिथोव्हन आवडतात. तरीही चायकोव्हस्की हा तिचा खास आवडता संगीतकार. तिनं असंही सागितलं की, तिला पियानो वाजवायला फार आवडत असे. पण तोच इथं आणायला न मिळाल्याचं तिला फार दु.ख होतं. तिचा विरंगुळाच हरवला होता.

तिला आवडेल अशी सुरावट सापडली. सिंफनी वाद्यवृंद चालू होता. त्या संगीताच्या पार्श्वभूमीवर ती आपल्याविषयी सांगत राहिली आणि मला संभाषणात ओढत मी माझ्याविषयी काही सांगावं असा प्रयत्न करत होती. 'ही मी अशी आहे. आयुष्याच्या या अशा फेऱ्यात सापडलेली आहे. माझ्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही, असंच जणू ती सुचवत होती.

मला कळत नव्हतं की, हे माझ्याच बाबतीत का घडतंय? मला मनातून जाणवलं होतं की, हे जरी उच्चपदस्थ असले तरी खऱ्या अर्थानं वनवासच भोगतायत. एक प्रकारे बहिष्कृत जमातीचं जीवन जगतायत. विशेषतः माझ्याइतकीच तीही कैदी वाटत होती. ती इथं आहे,

कारण फक्त तो इथं आहे. छावणी ३०३ चा खरा अधिकारी आहे तो पॉलीट्रक.

गरम चहा पिता पिता तिनं हळू आवाजात आपली कहाणी सांगितली. तिचं माहेर पिढयानपिढया सैनिकी पेशाचं होतं. तिचे वडील झारच्या राजवटीत कर्नलच्या हुद्द्यावर होते, पण कम्युनिस्ट राज्यक्रांतीच्या वेळी बोल्शेविकांनी त्याना ठार मारलं होतं. धाकटा भाऊ विख्यात स्मोल्नी इन्स्टिटयूटचं रक्षण करताना कामी आला. निजवी नोव्हगोरॉड या गावी असलेल्या घरातून तिला आईबरोबर पळ काढावा लागला. पण आईसुद्धा फार दिवस जगली नाही. ती उघडयावर पडली. पण तिनं जिद्दीनं नव्या आयुष्याचा स्वीकार केला. काम करण्याचा परवाना मिळवला. अतिशय कष्टाचे दिवसही सरून थोडे सुखाचे दिवस आले. खास कामगाराना मिळणाऱ्या विशेष सवलतींपैकी मिळणारी सुट्टी उपभोगायला ती याल्टाला गेली होती. तिथंच तिला उषाकॉव्ह भेटला आणि त्यानंतर तिनं त्यालाच पुढचं आयुष्यभर आपलं दैवत मानलं.

ती उषाकॉव्हशी अत्यंत एकनिष्ठ होती. त्याला पोलंडमधून इथं का पाठवलं,ते काही तिनं मला सांगितलं नाही. त्याला प्रथम व्हॅलडी व्होस्टॉकला पाठवलं. तिथून जवळजवळ सहा महिने त्याचं काही पत्र नाही की निरोपही नाही. तिच्या ओळखीच्या पार्टीमधल्या काही मित्रानी एवढंच सांगितलं की, त्याला सैबेरियातल्या एका छावणीवर प्रमुख म्हणून पाठविण्यात येणार आहे. तिने अविश्रांत धडपड केली, अतोनात खटपट केली आणि अखेर प्रवास-परवाना मिळवून या छावणीत उषाकॉव्हजवळ येऊन राहू शकली.

मी स्वतःला सतत बजावत होतो. मी कैदी आहे. तिला माझ्या विषयी कणव वाटतेय. कारण तीही थोडी-फार त्याच अवस्थेत आहे. तिला आपल्या माणसांकडे आपल्या व्यथा व्यक्त करता येत नाहीत. असंही जाणवत होतं की, ही बाई जशी हळवी, भावनाशील आहे तितकीच चलाखही आहे. आपल्याभोवती ज्यांचं उमेदीचं आयुष्य वाया चाललं आहे अशा कैद्याचा गराडा आहे, या जाणिवेनं ती आतून धसकली आहे. कुठल्याही सवेदनाक्षम स्त्रीसाठी ही जागा नव्हती. ती रशियन होती आणि रशियाच्या उज्ज्वल भवितव्याविषयी तिला जबर आस्था होती. तरीही ती एक स्त्री होती. आजूबाजूला घोघावणारं कैद्याचं उध्वस्त जीवन तिला अस्वस्थ करत होतं. दिवसचे दिवस, महिन्यामागून महिने हे पहात रहाणं तिच्या सहनशीलतेच्या पलीकडचं होतं.

आपल्या निळया डोळयांनी तिनं माझी नजर वेधून घेतली. 'इथून पळून जायचा कधी विचार केलायस का?' त्या प्रश्नानं मी उडालोच! प्रचंड धोका समोर उभा राहिला. तोंड उघडून आ वासला. तोंडातून शब्दच फुटेना! कसा फुटणार? माझा कप डचमळत कसाबसा खाली ठेवला. ती मात्र माझ्या भयचकित हालचाली आपल्या शांत, निळया, मनमोकळया नजरेनं निरखत होती.

आपल्या शांत आवाजात ती पुन्हा बोलू लागली, 'तू उत्तर देत नाहीयेस रावीझ, तुला माझा भरंवसा वाटत नाहीये. मला वाटत होतं, मला याबाबतीत बोलायला आवडेल. बोल, माझ्याजवळ बोलायला काहीच हरकत नाही...'

पलायन! जणू काही तिनं माझ्या मनात, पार आतमध्ये डोकावून माझ्या इच्छा–आकांक्षेचा अत्यंत धोकेबाज, परवलीचा शब्द अचूक पकडून बाहेर काढला होता. होय, मला तिच्याजवळ माझ्या स्वप्नाबद्दल बोलायच होतं; पण तिनंच हा प्रश्न विचारून माझी भाषाच बंद करून टाकली. नाही; शब्द फुटणं शक्यच नव्हतं. तेव्हढयात आयगॉर अवतीर्ण झाला. अत्यंत बेचैन, अस्वस्थ मन.स्थितीत मला निघावच लागलं. कुणी तरी मदतीचा हात पुढे करतंय् आणि तो स्वीकारता येत नाहीये, अशा अवस्थेत मी निघालो. तिनं शांत, औपचारिकपणे विचारलं, 'रेडिओ बिघडला तर पुन्हा येशील?' मी घाईघाईनं उत्तरलो, 'हो, हो, नक्की येईन. मला आवडेल यायला!'

पुढचे काही दिवस मला पुन्हा बोलावणं येईल, या आशेची ज्योत सतत तेवत होती. याच काळात सिग्मंड मॅकोवर्स्की या ३७ वर्षांच्या एका पोलिश कॅप्टनची ओळख झाली. स्वच्छ विचारांचा, ठणठणीत प्रकृतीचा, तरतरीत लष्करी अधिकाऱ्याचा पक्का ठसा उमटलेला असा तो होता. कोलमेतोप्रमाणंच मी त्याचीही मनात नोंद करून ठेवली. माझ्या मनोकामनेबद्दल मी त्याच्याजवळ काहीच बोललो नाही. कर्नल–पत्नीकडून कसल्या अपेक्षा करायच्या हे काहीच कळत नव्हतं. एवढंच वाटत होतं की, ती निदान आपल्याला थोडा-फार सल्ला देऊ शकेल.

अपेक्षेप्रमाणे तिचं बोलावणं आलंच. या वेळी ती एकटीच होती. मी रेडिओची बटणं फिरवत आमच्या मित्रासाठी काही बातम्या मिळतात का, ते पहात होतो आणि ती सैबेरियात येणाऱ्या ग्रीष्म ऋतूबद्दल बोलत होती.

मी संधी साधून उफाळून बोलू लागलो. 'मागच्या खेपेला काय झालं त्याबद्दल फार वाईट वाटतंय मला. माफ करा. त्या पद्धतीचे विचार खरंच माझ्या मनात घोळतायत, पण ही अनंत अंतरं, दुर्गम प्रदेश, या सर्वांतून मार्ग काढायला माझ्याजवळ कसलीच साधनसामुग्री नाही!'

'तू फक्त पंचविशीचा आहेस आणि पुढची २५ वर्षं या असल्या भयानक वातावरणात काढायचं तुझ्या मनात निश्चितच नाही, हे कबूल करायला, तुला घाबरायचं काहीच कारण नव्हतं. निदान माझ्याजवळ तरी!' ती म्हणाली, 'तू माझ्याबद्दल म्हणशील तर आमचं इथं तसं चांगलं चाललंय की. राहायला छान जागा आहे. तुमच्यापेक्षा सकस अन्न मिळतंय. हव्या तेवढया सिगरेटी मिळतायत. पण तरीही मलासुद्धा इथे २५ वर्षं काढावाशी वाटणार नाहीत. तेव्हा पलायन हे तुझ्या हृदयातलं गुपित असायलाच हवं आणि त्याबद्दल तू माझ्याजवळ बोललास, आपलं मन मोकळं केलंस तर त्याचा तुला फायदाच होईल!'

अशा तऱ्हेनं विषयाला वाट मोकळी झाली. एखाद्या त्रयस्थाच्या भूमिकेतून आम्ही विचार करू लागलो. आम्हीच प्रश्न उभे केले आणि

**अपेक्षेप्रमाणं तिचं बोलावणं आलंच....**

आम्हीच उत्तर शोधू लागलो. माझ्या मते इथून जर कोणी सटकू शकलाच तर पूर्वेला साधारण सहाशे मैल गेलं तर कामचाटका गाठता येईल आणि तिथून शेवटी जपानमध्ये शिरता येईल.

तिचं म्हणणं असं पडलं की, कामचाटकाला जाणं म्हणजे घोडचूक ठरेल. कारण त्या भागाला सीमारक्षणाच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्व होतं आणि साहजिकच तिथं कडा पहारा असणारच. त्यापेक्षा पश्चिमेकडे जाणाऱ्या एखाद्या आगगाडीतून सटकून उरलमधल्या खाणीमध्ये प्रवेश मिळवावा. तिथून कदाचित रशियाबाहेर पलायन करायला सोपं जाईल. अर्थात त्यासाठी प्रवास– परवाना, कामगार-परवाना यासारख्या महत्त्वाच्या कागद–पत्राचा प्रश्न उद्‌भवला असताच. त्या दिवशीच्या चर्चेतून एवढंच निष्पन्न झालं. त्या दिवशी रात्री बिछान्यावर पडल्या पडल्या विचाराचं थैमान चालू झालं. विचार करता करता असं वाटलं की, ती पलायनाच्या दृष्टीनं दक्षिण दिशेचा जाणून-बुजून विचार टाळतेय की काय ? समजा, दक्षिणेकडे पळालो. प्रचंड बैकल तलावाला वळसा घातला. पुढं ? पुढं काय ? अफगाणिस्तान–अचानक त्या देशाचं नाव डोक्यात घुमलं. पुरेसं दुर्लक्षित आणि तटस्थ राष्ट्र !

पुढच्या खेपेला कर्नलनं स्वत:च बोलावणं पाठवलं. मला गंमत वाटली की, त्याला खरोखरच त्या रेडिओच्या तंत्राचं ज्ञान नव्हतं. वास्तविक तसा तो तल्लख होता. रेडिओ या प्रकरणाचा त्याला किंचित दरारा वाटत असावा. नकोच त्याच्या वाटेला जायला. म्हणून मी त्याला निरनिराळी स्टेशनं लावायला हवा असायचो· त्याला बातम्या हव्या असायच्या. त्या त्याला भाषणं, बातमीपत्रांच्या द्वारे ऐकवत असे. त्यावरून त्याची खात्री पटायला लागली की, रशिया युद्धात नक्की अडकणार! त्याला युद्ध आवडत होतं, असं मुळीच नव्हे; पण सैबेरियातून सुटण्याची युद्ध ही एवढी एकच संधी त्याला दिसत होती आणि शेवटी त्याचं जे काही सैनिकी शिक्षण झालं होतं ते युद्धासाठी, तुरुंगाधिकारी म्हणून खितपत पडण्यासाठी नव्हे !

त्याच्या पुढ्यात पलायनाच्या वगैरे रम्य कल्पना बोलणं शक्यच नव्हतं. आपली बायको या असल्या भानगडीची चर्चा एका कैद्या-बरोबर करते हे जर त्याला चुकून कळलं असतं तर त्यानं हायच खाल्ली असती


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
–डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. विवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०,


माझी जायची वेळ झाली तेव्हा तो रेडिओ ऐकण्यात मग्न होता. ती मला पोचवायला दाराजवळ आली आणि म्हणाली, 'काही काळजी करू नकोस, सर्व काही ठीक होईल.'

*त्याच संध्याकाळी मी मॅकोवस्कीला संडासाजवळ गाठलं आणि* त्याच्याजवळ विषय काढला, 'काय रे, इथून पळून जाण्याविषयी तुला काय वाटतं ?'

'तुला काय वेड बीड लागलंय् काय ? आपल्याजवळ पळून जायला साधनं काय आहेत ?–आणि समजा सटकलो तर पुढं काय ?'

'मला थोडी मदत मिळण्याची शक्यता आहे.'

'मिळेल ? मिळालीच तर मी तुझ्याबरोबर आहे. साला वैताग आलाय या जागेचा !'

कर्नलच्या बायकोला या प्रकारच्या कटाची सूत्रचालक म्हणून काम करताना गंमत वाटत होती. मी इथून खरोखरच पळून जाईन किंवा कसं, याबद्दल तिच्या मनात नक्की काय आहे, हे मलाही नीटसं कळत नव्हतं. शक्यता अशी होती की, या इथल्या अत्यंत नीरस कंटाळवाण्या आयुष्यात काही तरी विरंगुळा म्हणून ती हे सर्व करत असेल.

शून्यातून बरंच काही उभं राहू पहात होतं. तिच्या आवडत्या चायकोव्हस्कीच्या संगीतरचना ऐकता ऐकता तिच्या योजना चालू होत्या. 'तुम्हाला अत्यंत तडफदार आणि सुदृढ तरुणांचा गट करावा लागेल. रोज पाव किलो मिळणाऱ्या पावातला पाव किलो भाग कारखान्यातल्या शेगडीच्या मागे ठेवून वाळवावा लागेल आणि तो लपवून ठेवायची व्यवस्थाही करावी लागेल. तुम्हाला थैल्या करता येतील अशा गोणपाटाची व्यवस्था मी करते. जादा कपड्यासाठी आणि पायताणांसाठी कातडंही लागेल. सैनिक हाकारे घालून 'सेबल' प्राण्यांना कोंडीत पकडतात आणि आमचे शूर अधिकारी त्यांची शिकार करतात. त्याची कातडी सुकवण्यासाठी बाहेरच्या तारांवर वाळत घातलेली असतात. जंगल-कामगारानी त्यातलं रोज एक एक पळवलं तर कोणाच्याही लक्षात येणार नाही. बाहेर पडण्याची योजना तुमची तुम्हालाच आखावी लागेल. तसे बाहेर पडा आणि दक्षिण दिशेला कूच करा ! ज्या रात्री प्रचंड हिमवृष्टी होईल ती रात्र निवडा, म्हणजे तुमच्या पळवाटा आपोआप झाकल्या जातील !'

इतकं सगळं बोलून झाल्यावर काही तरी आठवल्यासारखं ती म्हणाली, 'उषाकॉव्ह इथं छावणीत असताना तुमचा बेत अमलात आणू नका ! तो लवकरच याकुत्सला बैठकीसाठी जाणार आहे तेव्हा काय ते करा. माझ्यासाठी, कृपा करून एवढं करा !'

पतीबद्दल किती ही आस्था !

मी मॅकोव्हस्कीला तडक जाऊन गाठलं, 'आपण नक्की जायचं. आपल्यासाठी मदतीची व्यवस्था झाली आहे.'

'आपल्याला किती माणसांची गरज लागेल ?' तो.

'मला वाटतं सहाएक माणसं पुरेत.' मी म्हणालो.

'छान ! आपण तपास करू. माझ्या विश्वासातला आणखी एक-जण आहे.'

मला कोलमेनोची आठवण झाली. मी म्हणालो, 'मलाही एकजण माहीत आहे बाकीच्याना आपण उद्याच गाठू !'

(क्रमशः)

पुस्तके

## हाडकी हाडवळा

### आणखी एक दलित आविष्कार !

नामदेव ढसाळ हे नाव साहित्यक्षेत्रात आता नवीन राहिलेलं नाही. 'गोलपिठा' या त्याच्या कवितासंग्रहाची साहित्य जगतानं विशेष नोंद घेतली आहे. त्यानंतर 'आमच्या इतिहासातील अपरिचित पात्र : प्रियदर्शिनी' (इंदिरा गांधी) ही त्यांची दीर्घ कविताही चर्चेचा विषय बनली होती. आता त्यांची नवी कादंबरिका 'हाडकी हाडवळा' या नावानं प्रसिद्ध झाली आहे. हाडकी हाडवळा म्हणजे महाराना मिळालेली सामूहिक इनामी जमीन.

या पददलित समाजातील विविध प्रश्नांची नोंद इथे कथेच्या रूपानं श्री. ढसाळ यांनी घेतली आहे. बायजा ही या दीर्घकथेची नायिका. तिचा नवरा दाजीबा मुंबईला जनावरं ओढण्याची कामं करतो. इकडे बायजा आणि तिचा मुलगा सावळा कसंबसं जगत असतात. बायजा दिसायला सुदर. तिची तिच्या दिरावर – मनबावर – माया; पण तारुण्यात आलेल्या मनबाला मात्र फक्त बायजाचं शरीरच दिसत असतं...आणि एक दिवस रात्री मनबा बायजाशी अंगलट करू लागतो...बायजा त्याचा सूड घेते...असं हे अगदी थोडक्यात कथानक. बायजाच्या मनातील खेळ, महारवाड्यातील चाली-रिती आणि त्याच्या अनुषंगानं तयार झालेलं समाजमन याचा वेध ढसाळानी या ठिकाणी घेतला आहे. त्यानी स्वत:च प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, 'माझ्याभोवती वावरणाऱ्या महार कुटुंबातील आणि महारांशी संबंधित अशा अन्य जातीमधील स्त्री-पुरुषांचे, त्यांच्या रागा-लोभाचे, विकार-विलासाचे, द्वेष-जिव्हाळ्याचे आणि प्रसंगी अंतर्विरोधाचेही प्रत्यक्ष चित्रण म्हणजेच हे लेखन !'

ढसाळांनी हे निवेदन शहरी भाषेत केलं असलं तरी त्यातील संवादामधील खास प्रादेशिकता मात्र टिकून राहिली आहे. दलित साहित्यामधला बटबटीतपणा याही कलाकृतीत काही ठिकाणी दिसतो. 'अनुभवाची कलात्मक अलिप्तता' वगैरे पारिभाषिक शब्द न वापरताही ही कादबरी अस्पृश्याच्या मनातील कोंडमारा, त्यांची जगण्याची पद्धत याचं विवेचक वर्णन करते. त्याचमुळं तिच्यातील दोषांसह ती वाचनीय ठरते.

**हाडकी हाडवळा**
नामदेव ढसाळ
अस्मिता प्रकाशन, पुणे
पृष्ठे : १२६, मूल्य : १२ रुपये

## 'अनादी' !

दलित कविता अधिक सकस, निकोप अनुभवाविष्काराकडे चालली असल्याचं मत समीक्षक मांडत असतात. प्रसिद्ध कवी श्री. अर्जुन कांबळे याचा 'अनादी' हा नवीन काव्यसंग्रह वाचताना अधूनमधून या मताचं प्रत्यंतर येतं. स्वत:ला देशप्रेमी म्हणविणाऱ्याला त्याच्या जातीवर प्रेम करायला शिकविणाऱ्या या देशातील हे अनुभव. दलित कवितेत सामान्यपणे आढळून येणारा बटबटीतपणा या काव्यसंग्रहात क्वचितच दिसतो. ही कविता अनुभवाचं तटस्थ चित्रण करते.

'स्वातंत्र्याच्या पंचविसाव्या वाढदिवशी चाचपतोय स्वातंत्र्य ;' असं म्हणणारा हा कवी. सर्व जाती व पंथांना खुलं असलेल्या हॉटेलात त्याच्या भारतीयत्वालाच आव्हान दिलं जातं. त्यातूनच 'लीडर्स' सारखी कविता तयार होते.

'लोक बिथरतात तेव्हा लीडर्स मीटिंग बोलावतात.
लीडर्स लोकांची.
फाइव्ह स्टार हॉटेलात,' –

असा उपरोध इथे वारंवार दिसतो.

ही कविता स्वत:चा ठसा घेऊन आली आहे. तिचा घाट, बांधा वेगळा आहे. तिची प्रतिमासृष्टीही वेगळी आहे.

नंदनवनातील फुले आस्वादताना
त्यांनी–आमचे पाय गाडून टाकले.
सुगंधित फुलांचे गंध चोरून
त्यांनी पगा महाल उभारले.

असं म्हणणारी ही कविता काही ठिकाणी मात्र बाळबोध होते. पण तरीही दलित साहित्यामध्ये या सग्रहाचा उल्लेख करणं अगत्याचं ठरणार आहे.

–मुकुंद संगोराम

**अनादी (कविता)**
अर्जुन कांबळे
तक्षक प्रकाशन, मुबई
पृष्ठे : ६४, मूल्य : १० रुपये

फिनिक्स

## पुस्तकांच्या आणि नियतकालिकांच्या जगात....

पुस्तकांच्या जगात वावरणाऱ्या लोकांना एक प्रकारचे विचित्र समाधान मिळत असते. लोक भले त्याला पुस्तकवेडा, पुस्तकी किडा म्हणोत; परंतु वर्षानुवर्षे जर तुम्ही पुस्तकाच्या गराड्यात काम केलं असेल तर तुमच्यात एक प्रकारची अलिप्तता येते व लोकाच्या कुजबुजण्याकडे तुम्ही लक्ष देत नाही. घरी रॉकेल, साखर, शाळा, होमवर्क, घरमालक वगैरेंच्या कटकटीतून ग्रंथालयात आलो की, दुसऱ्याच विश्वात पाऊल ठेवल्यासारखे वाटते व वेळ असा काही भरंकन निघून जातो की, घड्याळाकडे बघून थोडासा धक्काच बसतो. काही काही लोक रहात्या घरीच वर्गणी-ग्रंथालये चालवतात. सततच पुस्तकाचे सान्निध्य ! मीसुद्धा असंच एक स्वप्न पहात आहे. ( म्हणजे पहात होतो ! ) दोन ओनरशिपचे ब्लॉक समोरासमोर. एका ब्लॉकात रहाणे, दुसऱ्या ब्लॉकात ग्रंथालय ! स्वर्गाकडे जायला वामनाची तीन पावलेसुद्धा नकोत, दोनच पुरतील !

या संदर्भात श्री. बाबुराव पटेल यांचे 'टाइम्स' मधील पत्र ओघाने आठवते. श्री. अंतुले हे पंतप्रधान होतील असे श्री. बाबुरावानी म्हणे भाकित केले होते. पुढे श्री.

अंतुलेंनी म्हणे मुंबईतील हाउसिंग बोर्डातील दोन फ्लॅट्स बाबुरावाना ( अर्थात् ) आउट ऑफ टर्न अलॉट केले ! त्यावर हे मदर इंडियाचे संपादक काय लिहितात : ' माझे कुटुंबीय आणि मीच काय पण माझे ग्रंथालय-सुद्धा या दोन फ्लॅटमध्ये मावू शकणार नाही !' Some पहाडी अहंता !

सध्या संपादकांची खादेपालट सुरू आहे. हवाच तशी! इलस्ट्रेटेड वीकलीचे श्री. कामत गेले. त्याचे जागी श्री. के. सी. खन्ना आले. डेबोनेअरचे (भारतीय प्लेबॉयचे) श्री.विनोद मेहता गेले. त्यानीच डेबोनेअरला हा मान मिळवून दिला असे काही लोकाचे म्हणणे होते. त्यांच्या जागी श्री. अनिल धारकर आले. इतरही अनेक संपादक बदलले आणि आता बुक-डायजेस्टचे श्री. मार्टिन ग्रॉस हेही जात आहेत. ( एव्हाना गेले असतील ! ) त्यांनी अनेक वर्षं बुक-डायजेस्टचे काम पाहिले. नवीन पाश्चात्य लेखकांच्या अनेक दिलखुलास मुलाखती या मासिकात आल्या. कैक लेखकांची उत्कृष्ट व नवीनवी पुस्तके या बुक-डायजेस्टमध्ये संक्षेपित करून त्यानी वाचकांना दिली होती; परंतु एकूण बुक-डायजेस्टची मागणी वंघता वाचकाना दुधाची तहान ताकावर भागवावीशी वाटत नाही असे दिसते ! शेवटी काही वाचक अगदी दमदार असतात. मूळ पुस्तक चार आकडी पानात असले तरी ' मला ओरिजिनल द्या, मिस्टर !' असे म्हणणारे. मी जेव्हा बुक-डायजेस्टची वर्गणी भरली होती तेव्हा वाटले होते की, या डायजेस्टमध्ये संक्षेपित होऊन आलेली पुस्तके बाजारात विक्रीला आली तर ती कुणी वाचणार नाही; पण झाले अगदी उलट ! बुक-डायजेस्टला थोडेसेच वाचक मिळाले. ओरिजनल पुस्तकाला भरपूर. श्री. मार्टिन ग्रोस आता एका पुस्तकप्रकाशन संस्थेचे संपादक होणार आहेत ! पुण्याचे वाचक गुणग्राहक व रसिक खरे !

कधीकधी सपादक बदलल्यावर मासिकाचा चेहरा-मोहराच बदलतो. श्रेस्टॉमॅनिएक ( थावा ! थावा ! वाईट निर्णयावर एकदम येऊ नका. सिंगाने अनेक चांगल्या गोष्टी लिहिल्या आहेत. उत्कृष्ट इंग्रजी लिहिले आहे. माणसाचे नुसते दोष काढत बसणे योग्य नाही ! ) खुशवंतसिंगांनी ' वीकली ' सोडल्यावर श्री. कामतांच्या कारकीर्दीत तिने जे सोवळं नेसलं ते अजून जायचं आहे. विल्यात ' फॉर्च्यून ' नावाच्या मासिकाची मी आताच वर्गणी भरली आहे. या मासिकाच्या संपादकीय मंडळातसुद्धा काही दिवसापूर्वी फेरफार झाले होते. बहुतेक Future Shock वाले श्री. एल्विन टॉफ्लर हे या मासिकाचे संपादक होते !

एखादा भव्य सिनेमा सुरू होण्याच्या आधी जशी भव्य टायटल्स येतात तसचं एखादं मासिक उघडलं व संपादक, अध्यक्ष, चेअरमन, एक्झिक्युटिव्ह प्रेसिडेंट, मॅनेजिंग एडिटर, ग्रुप व्हाइस प्रेसिडेंट, नॅशनल एडिटर, आर्ट डायरेक्टर, स्टाफ रायटर, सिनियर रायटर अशी भारदस्त नावे वाचली की मन सुन्न व थक्क होऊन जातं. या मासिकाचे शेअर्ससुद्धा निघतात आणि आपल्या नियतकालिकात काय एक दोन संपादकाची नावे! अमुक वर्ष, अमकावा अंक व प्रकाशित झालेल्या लेखाबद्दल संपादक सहमत असतीलच असे नाही, असा मजकूर! हा शेवटचा प्रकार तेथे आउटडेटेड झाल्यासारखा वाटतो. कारण यातला मजकूर पाश्चात्य नियतकालिकात क्वचितच आढळतो ! मासिकाच्या जगातील अनेक नावे तिथे पडली. सॅटरडे इव्हिनिंग पोस्ट, लाइफ ( बंद पडून परत सुरू ), कॉरॉनेट, पेजंट, वाईड वर्ल्ड अशी किती तरी नावे स्मरणात येतात. आपली अनेक मराठी नियतकालिकेही बंद पडतील असे वाटते. मी १९५९ मध्ये ग्रंथालय सुरू केले तेव्हा अमृतच्या ६ ते ८ प्रती लागत असत. हंस ६ लागत असत पण आता सर्व मराठी मासिकाची मागणी इतकी कमी झाली आहे की, ती विचारी जगतात कशी हे एक गूढच आहे !

मी तरुण असताना लेखकाविषयी माझ्या मनात काही कल्पना घर करून बसल्या होत्या. काफ्कासारखा सेन्सिटिव्ह दिसणारा लेखक मी तरी आतापर्यंत पाहिला नाही ! कान, नाक, डोळे सालं त्याचं सर्वच इलेक्ट्रॉनिकली सेन्सिटिव्ह ! त्याचं एक वाक्य बघा— ' Only a party to a case can really judge, but, being a party, it cannot judge. Hence there is no possibility of judgment in the world but only a glimmer of possibility. '

सध्याची एक सेन्सिटिव्ह लेखिका म्हणजे जॉइस कॅरॉल ओटस. चिमणीएवढा गळा व नाजूक अगतिक पक्ष्यासारखा चेहरा; पण लेखणी माळढोक पक्ष्यासारखी ! दुसरी एक संवेदनाशील उल्लेखनीय लेखिका म्हणजे डॉरिस लेसिंग (woman) prophet of Doom; परंतु चित्रात मात्र बरेच वेळा स्मित करीत असते. लेखक म्हणजे पातळ सेन्सिटिव्ह चेहरामोहरा असलेला माणूस. चेहऱ्यावर नेहमी मोबाइल अभिव्यक्ती वगैरे वगैरे, असे मला नेहमी वाटत असे.

पण पुढे पुढे माझ्या या कल्पनेला तडे गेले. जे. बी. प्रीस्टले, पु. भा. भावे, आचार्य अत्रे वगैरे वगैरे दाणगट, रासवट लोकांचे फोटो बघून मला आश्चर्य वाटले. जितका रासवटपणा व दाणगटपणा अधिक तितकीच लेखकाची भाषा अधिक तरल असा मला अनुभव येऊ लागला ! खुशवंतसिंग बघा. अगदी ट्रक-ड्रायव्हरसारखा किंवा स्पेअर पार्टवाला दिसतो. इतर अनेक चांगले लेखक चक्क मुरलेल्या व्यापाऱ्यांसारखे दिसतात. एका इंग्रजी उच्चभ्रू लेखकानेच माझी अपेक्षा खरी केली. ते म्हणजे ग्रॅहॅम ग्रीन. तरुणपणी अगदीच रिफाइन्ड व सेन्सिटिव्ह. ' नोबेल प्राईझ ज्याला सारखी बगल देते ' असे सुद्धा या लेखकाचे वर्णन करण्यात येते. दरवर्षी या लेखकाचे नाव स्वीडिश ॲकॅडमीपुढे जाते व पडते. ग्रीनसाहेब, आता तुम्हाला जर हे नोबेल पारितोषिक मिळाले तर सार्त्र-सारखं ते नाकारा, म्हणजे तुमचं नाव अधिक प्रकाशझोतात येईल ! त्यांना आणखी दुसरी एक उपाधी मिळालेली आहे ती अशी : ' highbrow thriller writer. ' ग्रॅहॅम ग्रीन हे जसे फारसे मागणीचे लेखक नाहीत तसे ते फोडणीचे लेखकही नाहीत. साधे लेखक हे सरळसोट प्रामाणिक लेखन करत असतात. फोडणीचे लेखक मागणीकडे बघून लेखन करीत असतात. ( नियतकालिकांविषयी ही कल्पना मला वाटतं मी ' माणूस' मधेच वाचली होती. ) तरीसुद्धा स्वीडिश ॲकॅडमीने अशी सबब सांगितली की, ग्रॅहॅम ग्रीन हे एक अतिलोकप्रिय लेखक आहेत, तर त्याना नोबेल पारितोषिक देणे योग्य होणार नाही ! मॅगसेसे पारितोषिक हे एशियातील नोबेल पारितोषिक समजले जाते; परंतु ते नेहमीच डॉक्टर्स लोकांना का दिले जाते ? साहित्याबद्दल हे एशियाचे नोबेल पारितोषिक

कुणाला मिळाले असे माझ्या तरी वाचण्यात किंवा ऐकिवात आले नाही.

दुसऱ्या एका इंग्रजी लेखकाचेसुद्धा असेच वर्णन करण्यात आले. त्यालासुद्धा नोबेल पारितोषिकाने अनेक वर्षं बगल दिली आहे. श्री. विद्याधर (सांभाळा हो, पुंडलिकसाहेब ! एस. नायपॉल ! सर्प्राइझिंगली हा लेखकसुद्धा दिसायला सेन्सिटिव्ह चेहऱ्यामोहऱ्याचा वाटतो. आपल्या इंडियाबद्दल लिहिताना त्यांना अंगात आल्यासारखं होतं. काय करणार ? तरीही बिचाऱ्यांना नोबेल पारितोषिक मिळत नाही ! स्वीडिश अॅकॅडमी म्हणते, 'अहो, हा नायपॉल Mr. Paul बिल कुणी नाही. दिसायला बघा अगदी इंडियनसारखा दिसतो. Wheatish complexion and all ! त्याला नाही देता येणार नोबेल पारितोषिक !'

आणि पुस्तकाच्या जगात काही नवीन घटना म्हणजे श्री. डेव्हिड आर्यावग यानी लिहिलेले एक वेगळे पुस्तक. दुसऱ्या विश्वयुद्धात अलाईड फोर्सेसचे जनरल्स एकमेकावर नेहमीच डाफरत असत. आइझेनोव्हर यांनी अनेक जनरल्सच्या आत्मचरित्रातून इतर जनरल्सबद्दलचे *उल्लेख गोळा* केले व त्यांची क्लासिफाईड यादी तयार करवली. या जनरल्समध्ये मतभेद किती खोल होते हे त्यांना Posterity ना दाखवायचे होते. त्या वेळी आइझेनोव्हरचे इन्स्पेक्टर जनरल होते एव्हरेट ह्यूजिस. त्यानी युद्धाच्या शेवटच्या दोन वर्षांत हे सर्व एका डायरीत लिहून ठेवले होते.

लहानपणी आमच्या डहाणू गावी के. एल्. पोंडा हायस्कूलमधे एक श्री. नाचणे नावाचे मास्तर होते. मोठेच विलंदर. कुणीही वाईट अक्षरे काढली की, 'मूर्खा, काय या कागदावर कोंबडी हगवून ठेवलीस ! नाही वाचणार तुझा मजकूर !' तसेच या एव्हरेस्टसाहेबांनी सतत दोन वर्षे कागदावर कोंबडीला मन मानेल तसं विरेचन करू दिलं. कुणाची विशाद की त्यातून काहीही अर्थ काढावा. हे सर्व काम शेवटी श्री. डेव्हिड आर्यव्हिग यानी केलं. ( B. P. वाढलं असेल बिचाऱ्याचं ! ) याच विषयावर ते एक नवीन पुस्तक काढत आहेत. त्याचे नाव आहे, 'War between the Generals.'

इंग्रजी पुस्तकाचं व नियतकालिकांचं जग म्हणजे खरंच एक अफाट अभयारण्य आहे ! झाले आमचे आठवड्याचे १०००–११०० शब्द ! परत आणखी केव्हा तरी.

—जे. एन्. पोंडा

रंगभूमी

# आक्रोश : कलेच्या दुनियादारीचा

विविध क्षेत्रातल्या ख्यातनाम लोकाबद्दल सामान्य जनतेला नेहमीच कुतूहल असतं आणि हे कुतूहल, औत्सुक्य सिनेमासृष्टीतल्या मंडळीबद्दल तर प्रचंडच असतं. सर्वांत जास्त! सिनेनट–नटयांना 'फॅन्स' असतात. जेव्हा एखादा नट किंवा एखादी नटी आपल्या करिअरच्या शिखरावर असते तेव्हा त्यांची लोकप्रियताही तेवढीच उत्तुंग असते. प्रत्येक सिनेमा हीट होत असतो, ते जातील तिथे लोकांचा गराडा, प्रेस–फोटोग्राफर्सच्या कॅमेऱ्याचे उडणारे असंख्य फ्लॅशेस...एकंदरीत ती मंडळी सर्वार्थाने 'टॉप'ला असतात !

पण याच मंडळीची जेव्हा वयं वाढतात, एकेक सिनेमा पडू लागतो तसतसे हे कलाकार झपाट्याने मागेही पडू लागतात. या व्यवसायातल्या जीवघेण्या शर्यतीत त्यांची दमछाक होते. ते थकतात, थाबतात, त्यांना थाबावंच लागतं !

एके काळी प्रखर तेजानं तळपणारे हे तारे आणि तारका जेव्हा एखाद्या उल्केप्रमाणे कोसळतात तेव्हा त्यांची किंमत दगडाइतकीसुद्धा राहात नाही आणि मग या वेळी त्यांची मनोवस्था कशी होते ?

कलावंत आणि त्याचं जीवन हे बाहेरून नेहमीच मोठं लोभसवाणं दिसतं. त्याचे चाहते त्याच्यावर जीव टाकत असतात, कलावंताच्या आयुष्याचा हेवा करीत असतात; पण प्रत्यक्षात त्याचं वागणं असतं कस ? कलावंताचं स्वतःच्या संसारात लक्ष नसेल तर त्याच्या घरच्या लोकाची त्याच्याविषयी काय भावना होते ?

असे काही प्रश्न घेऊन 'अभिषेक' निर्मित 'आक्रोश' हे नाटक येतं. या नाटकात प्रश्न आणि संघर्ष केवळ मांडलेले आहेत. कारण उत्तरं न सापडलेल्याच या समस्या आहेत.

वनितादेवी ही सिनेसृष्टीतली अत्यंत गाजलेली सुंदर अभिनेत्री, पण एके काळची ! आता तिचा काळ मागे पडलाय. ती वयस्क झाली आहे, हे एक अत्यंत कटु सत्य आहे. ते तिच्या वारंवार समोर येत राहतं. ते तिला मान्यही आहे; पण पचवता मात्र येत नाही. एके काळी आपले चाहते आपल्या मोटारीचीदेखील चुंबनं घ्यायचे, गाड्यांवरची धूळ माथी लावायचे; तेच लोक आज आपण रस्त्यानं हिंडलो तरी ढुंकूनदेखील पहात नाहीत, हे भीषण वास्तव स्वीकारणं खरोखरच कठीण आहे; पण वनितादेवी त्याचीदेखील आता सवय करीत आहे.

अनेक वर्षं झगझगाटात काढल्यानंतर आताचा मोकळा वेळ तिला अगदी खायला उठतो. जुने दिवस सतत आठवत राहतात. ते दिवस अगदी परवापरवापर्यंत होते आणि आता अचानक कुठे गेले तेच तिला कळत नाही.

ती आता खूप भावनाप्रधान आणि हळवी बनली असली तरी भोळी मात्र नक्कीच नाही ! या सिने-इंडस्ट्रीत नाव कमावण्यासाठी, टॉपची अभिनेत्री म्हणून टिकून राहण्यासाठी काय किंमत मोजावी लागते, विशेषतः एका नटीला काय किंमत चुकवावी लागते, ती सर्व तिने चुकवलेली आहे. ही इंडस्ट्री आणि त्यातली माणसं यांची तिला पुरेपूर माहिती आहे, जाण आहे आणि तरीही या इंडस्ट्रीवर, अभिनेत्रीच्या व्यवसायावर तिचं प्रचड प्रेम आहे !

पण सध्याच्या या एकाकी अवस्थेत तिला आपल्या मुलाचं अस्तित्व–तेसुद्धा बोचरं अस्तित्व–जाणवू लागतं. हा मुलगादेखील प्रचंड एकटा आहे. म्हणजे इथं एकाच घरात दोन एकटी माणसं एकत्र रहात आहेत.

या मुलाबद्दल – भरतबद्दल – वनितादेवी भलतीच निराश आहे वास्तविक, वाचनाची खूप आवड असलेला, हुशार, फर्स्ट क्लास करिअरचा हा मुलगा...दिसायलादेखील चागल्यामध्ये मोडणारा, उंचापुरा झकास

तब्येतीचा; पण गेली काही वर्षं तो काहीही करत नाही. फक्त रात्रं-दिवस रमी खेळतो ! त्यामुळे वनिता त्याच्यावर फारच नाराज आहे.

पण भरतचीदेखील एक कैफियत आहेच की ! जेव्हा तो लहान होता तेव्हा त्याची आई—वनितादेवी करिअरच्या, लोकप्रियतेच्या आणि वैभवाच्या शिखरावर होती. पाय चाटणाऱ्या निर्मात्यांच्या रांगा दाराशी लागलेल्या असायच्या. रात्रं-दिवस दिवाणखान्यात दिमाखदार पार्ट्या झडायच्या. वनितादेवी वैभवाच्या मदात आणि तारुण्याच्या कैफात होती. तेव्हा हा छोटासा भरत तिच्या खिजगणतीतही नव्हता !

तेव्हापासून पत्ते हेच भरतचं सवंगडी, दोस्त सर्व काही बनलं. बाहेर दिवाणखानात शांपेन पाण्यासारखी वाहात असायची. हास्यविनोदाची कारंजी उसळायची आणि इकडे छोटा भरत पत्त्यामध्ये बुडून गेलेला असायचा. यातूनच चेहेऱ्यावर सतत खोटे भाव घेऊन वावरणाऱ्या चित्रपटसृष्टीतल्या या लोकांविषयी त्याच्या मनात घृणा उत्पन्न झाली. तो स्वतःच्या आईचादेखील तिरस्कार करू लागला.

तसं स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा त्याने खूप प्रयत्न केला, पण वनितादेवीचं नाव सतत त्याचा पिच्छा पुरवत होतं. तो निराश झाला. पत्ते आणि रमीचा डाव यातच जीव रमवू लागला. तोसुद्धा एकांगी बनला. ज्या स्त्रीने आपल्याला कधीच आईची माया दिली नाही तिला आपल्यापासून सुखाची अपेक्षा करण्याचा अधिकारच काय, हा प्रश्न या माय–लेकांच्या शीत–संघर्षाचं कारण बनला.

वनितादेवी आणि तिचा मुलगा भरत, या दोन एकट्या जीवांमधला संघर्ष यावरच 'आक्रोश' उभं आहे. चित्रपटात करिअर करायची ठरल्यावर घराकडे, मुलाकडे थोडंसं दुर्लक्ष होणारच, अशा मताची वनिता, तर कलावंताच्या गोंडस मुखवट्याखालचं व्यसनी आणि हिडिस रूप बघितल्यामुळं वैतागून न्यूनगंडाचा एक कोष बनवून एकाकीपणे राहणारा भरत, हे एकत्र येताच संघर्ष अपरिहार्य बनतो.

भरतची भूमिक करणाऱ्या रवींद्र मंकणीचं हे पहिलंच व्यावसायिक नाटक. यात त्याला भूमिकाही महत्त्वाची आहे. त्यात तो कुठेही कमी पडला नाही. देहयष्टी व आवाज हे दोन्ही महत्त्वाचे घटक त्याच्याजवळ असल्याने तो या या भूमिकेत शोभूनही दिसतो. थोडंसं झुलत संवाद बोलण्याच्या दोषावर त्याने मात केलेली दिसली; पण एक–दोन प्रसंगांमध्ये आपल्या हातांचा वापर नक्की कसा करावयाचा, असा प्रश्न त्याला पडला असावा, पण हा दोष त्याचा की दिग्दर्शकाचा ? आपली आई दारू पिऊन नाचते आहे, हे पाहिल्यावर भरतचा उद्वेग आणि चीड रवींद्र मंकणी चांगल्या प्रकारे दाखवतो; पण त्याचं रडणं मात्र जरासं आक्रस्ताळेपणाचं वाटतं. ते आणखी संयमित हवं !

वारंवार आपल्या सोनेरी भूतकाळात हरवणारी, त्या सुखद आठवणींनी मोहरून जाणारी, पण वास्तवता लक्षात येताच उदास होणारी, स्वतःच्या म्हातारपणाच्या जाणिवेनं हादरलेली वनितादेवी लालन सारंग यांनी

---


योद्धा शेतकरी

शेतकरी नेते श्री. शरद जोशी
यांचे व्यक्तिमत्त्व व विचार
सादर करणारे, तसेच त्यांच्या
व कै. माधवराव बोरस्ते,
श्री. प्रल्हाद पाटील,
श्री. माधवराव मोरे
इत्यादींच्या नेतृत्वाखाली
लढल्या गेलेल्या नासिकच्या
ऊस–शेतकरी–आंदोलनाचा
चक्षुर्वै सत्यं वृत्तान्त
कथन करणारे पुस्तक

लेखक : विजय परुळकर

सचित्र आवृत्ती । पंचरंगी मुखपृष्ठ । किंमत : रुपये छत्तीस

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

उत्कृष्ट उभी केली आहे. या भूमिकेच्या सर्व गरजा त्या व्यवस्थितपणे पूर्ण करतात, पण त्यांच्या एकसुरी आवाजाचा त्रास इथेही जाणवतोच.

रमीमध्ये भरत अजिक्य बनलेला असतो तो कशामुळे ? त्याच्याच शब्दात सांगायचं तर तो नेहमी गोठलेल्या रक्तानं खेळत असतो; पण एक दिवस त्यालाही हारवणारी एकजण भेटते— गौरी !

वनितादेवीच्या मैत्रिणीची ही मुलगी-पावसात चमकलेली वीज, स्वच्छ हवा किंवा अशाच कोणत्याही लहान सहान गोष्टींनी प्रचंड आनदित होणारी. जीवनाचा प्रत्येक क्षण भरभरून जगू इच्छिणारी ही गौरी वनिता आँटीसारखी खूप मोठी नटी व्हायचं स्वप्न घेऊनच मुबईला वनिताच्या घरी रहायला येते. पण बघता बघता भरत आणि गौरी प्रेमात पडतात. भरतचे गोठलेलं रक्त गरम करण्यात गौरी यशस्वी होते. आला दिवस मस्तपणे घालवणं आवडत असल्याने ती शूटिंग वगैरेला दाड्या मारते. फिल्म—मध्ये मोठी करिअर करणार, अशा घोषणा करणारी गौरी तिच्या आईसारखीच, फिल्मपेक्षा संसार श्रेष्ठ, असं मानायला लागते.

आणि गौरी संसारात पडतेदेखील. पण भरतशी लग्न करून नव्हे, तर नंदू नावाच्या दुसऱ्याच तरुणाचा हात धरून. हे स्थळ तिच्या आईनं ठरवलेलं असतं. ती पहिल्याच भेटीत नंदूच्याही प्रेमात पडते.

भरतवर प्रेमाचा वर्षाव करणारी त्याचं एकलेपण संपवणारी गौरी एकाएकी दुसऱ्याबरोबर गेल्याचं पाहून आपल्याला थोडं आश्चर्य वाटतं पण गौरी हे सर्वांत प्रॅक्टिकल पात्र आहे. फिल्म—अभिनेत्री बनून वनितासारखी जीवनाची शोकांतिका करून घेण्यापेक्षा संसार आणि मुला—बाळात रमून नवऱ्याबरोबर सुरक्षितपणे जीवन जगणं ती पत्करते.

भरतबरोबरचं तिचं प्रेमही खरंच असतं, पण भरतबरोबरचं आयुष्यही अस्थिरच असतं. कदाचित भरतमधला एक निष्ठुर आणि क्रूर असा स्वभावगुण तिनं ओळखला असावा. पण भरत गौरीच्या भावी पतीला आपल्या प्रेमाबद्दल सागतो, त्याचं लग्न मोडायचा एक आडमुठा, अयशस्वी प्रयत्न करतो. पण आणखीन एक महत्त्वाचं पात्र म्हणजे गुल्लु हा पोरगा. सातवी इयत्तेत शिकणारा अत्यंत आगाऊ, व्रात्य, असा हा मुलगा रमी खेळत असतो, त्यासाठी घरी खोटं बोलणं, चोऱ्या करणं हे प्रकारही करत असतो. उच्चभ्रू वर्गातील एक प्रातिनिधिक असा हा मुलगा तो थोडासा दुर्लक्षित आणि बराचसा लाडावलेला आहे असं जर त्याचं चित्रण झालं असतं तर ते ठीक होतं. पण इथे गुल्लुला भरत कुठे तरी गुल्लुमध्ये स्वतःला पाहू लागतो आणि त्यामुळे भरतच्या एकटेपणाची धार कमी होते.

हा दोष किंवा ही उणीव सागर सरहदी यांच्या मूळ नाटकात आहे की रूपांतर करताना हे घडलं आहे ते माहित नाही.

वनितादेवीचा एक जुना इंडस्ट्रीवाला दोस्त मलकानी म्हणजे मूर्तिमंत 'इंडस्ट्री' आहे. अत्यंत सैल, चारित्र्यहीन वागणं, कायम दुसऱ्याच्या पुढे पुढे करायची सवय आणि संधी मिळताच दुसऱ्याला फसवण्याचा स्वभाव वनितादेवीचा पूर्णपणे उपभोग या माणसाने घेतला आहे, हे आपल्याला जाणवतं तिच्या नावाचा, पैशाचा, शरीराचा याने व याच्यासारख्या अनेकांनी फायदा उठवला आहे. शेवटीदेखील तो तिला फसवतोय आणि शातपणे दुसऱ्या एका नवीन, तरुण अभिनेत्रीकडे जातो, कारण ही वनिता आता 'बुढ्ढी' झाली आहे, हे त्याला पक्कं ठाऊक असतं.

धूर्त, मतलबी मलकानीची भूमिका सुधीर जोशी यानी यथायोग्यपणे केली आहे. विशिष्ट ढंगात हिंदी बोलणं आणि टायमिंग साधून सवाद ऐकणं यामुळं मलकानीला भरपूर टाळ्या मिळतात.

नंदूच्या भूमिकेत श्री. राजन ताम्हाणे, जावेद या अनावश्यक भूमिकेत श्री. अजय वढावकर ठीक. श्री. वढावकर यांना आता एखादी मोठी भूमिका मिळाल्यास त्याच्या गुणाचं चीज होईल असं वाटतं.

बाबा पार्सेकर याच नेपथ्य कल्पक आहे. एकच सेट आहे. पण सर्व खोल्या वगैरे नीट दाखवलं आहे. सेट श्रीमंती तर खराच, पण भपकेबाज वाटत नाही. वेगवेगळ्या ट्रॉफ्या आणि फिल्मफेअर ॲवॉर्ड वनितादेवीच्या 'ग्लोरिअस पास्ट'ची चागली जाणीव देतात.

अजित मर्चंट यांचं संगीत आणि बाबा आंबेडकर यांची प्रकाशयोजना नाटकातल्या प्रसंगांना पोषक अशीच होती.

प्रख्यात उर्दू लेखक, सागर सरहदी यांचं हे नाटक. सरहदी यांचा सिनेसृष्टीशी जवळचा संबंध असल्याने त्यांनी व्यक्तिरेखनात व इतर बरेचसे बारकावे दाखवले आहेत. रूपांतरातही श्री. कमलाकर सारंग यांनी ते बारकावे टिकवले आहेत.

या संपूर्ण नाटकात भरतच्या बापाचा चुकुनही उल्लेख नाही. यातून दोन गोष्टी साध्य होतात. वनितादेवींचं बेताल वागणं सिद्ध होतं आणि नटीच्या घरात नटीपेक्षा कोणीच मोठं नसतं, याचीही जाणीव होते. नटीचा नवरा (असल्यास) हा सर्वांत उपेक्षित व दयनीय जीव असतो आणि एकूणातच त्या नटीच्या व्यक्तिमत्त्वापुढे इतर सर्व निस्तेज बनत असतात.

उर्दूसारख्या अत्यंत सपन्न आणि चमकदार भाषेतले हे नाटक मराठीत घ्यायचे ही अवघड कामगिरी श्री. कमलाकर सारंग यांनी बऱ्याच अंशी यशस्वीपणे पार पाडली आहे. आता प्रत्येक भाषेलाच काही मर्यादा असल्याने क्वचित प्रसंगी भाषातर जाणवतं, हा भाग वेगळा.

व्यक्तिरेखा उभ्या करताना नाटक कंटाळवाणं किंवा भडक, दोन्ही होणार नाही, याचीही दक्षता दिग्दर्शक कमलाकर सारंग यानी घेतली आहे.

या समस्येला किंवा संघर्षाला काहीच उत्तर नसल्याने नाटकाचा शेवटही अनिश्चित व्हावा, हे योग्यच. त्या वेळचा छाया—प्रकाशाचा वापर समर्पक.

हे नाटक एखाद्या विशिष्ट जीवनावर आधारित असेल असं वाटत नाही, कोणताही कलावत जो मूडी, व्यसनी आणि बेताल आहे त्याच्या जीवनात शेवटी हेच घडणं जास्त संभवतं; पण त्याचे नातेवाईक किंवा त्याची मुलं सगळं काही गप्पपणे सोसत असतात. त्याचा हा मूक 'आक्रोश' सागर-सरहद्दी आणि कमलाकर सारंग यांनी आपल्यापुढे सादर केलाय एका प्रेक्षणीय नाटकाद्वारे !

—निखिल गजेंद्रगडकर

MANOOS ( Marathi Weekly ) 100 Paise Regd. No. PNC–W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11 )


# मी आलेय मिंटी
# एक खारोटी





स्वभाव माझा जागरूक,
वृत्ती माझी संचयी,
चालणे माझे चपळ
वागणूक माझी निगर्वी.
सेतूबंधनात आपला वाटा
उचलून
रामाचा आशीर्वाद मिळविलेली
आजही थोरामोठ्यांचे
आशीर्वाद असेच आहेत
पाठीशी.
माझं घर होतं दूर रानात
झाडाच्या ढोलीत
आता मात्र माझं घर खेड्यात,
शहरात
महाबँकेच्या शेकडो शाखांत.

मी आलेय मिंटी
मी म्हणजे महाबँक

## बँक ऑफ महाराष्ट्र

( भारत सरकारचा उपक्रम )

मुख्य कचेरी : 'लोक मंगल', शिवाजीनगर
पुणे ४११ ००५